# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८.५.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १८ मे २००७ रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ३.५० वाजता ''वंदेमातरम्'' या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
०२. स.स.श्री.संतोष सर्जेराव खेंडके पाटील
०३. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०४. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१४. स.स.श्रीमती आशान्ना लक्ष्मी शंकर
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२४. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२५. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२६. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२७. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन

२८. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
२९. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३१. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३३. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३४. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३५. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३६. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३७. स.स.श्री.खान निसार मो.खान
३८. स.स.सौ.राऊत छाया विलास
३९. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४३. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४५. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४८. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
४९. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५५. स.स.श्री.खुडे विजय किसन
५६. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५७. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५८. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५९. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६०. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६२. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६३. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६४. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर

६५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६६. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६८. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
६९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७१. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७२. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
७३. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७४. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

श्री.अ. रशिद खान : दुपारी १.०० वा. नमाजच्या वेळी हैद्रांबादमध्ये मक्का मस्जीद मध्ये कुणीतरी पाच बॉम्ब ठैवलेले होते. त्याती एक बॉम्ब फुटल्याने त्या पाच लोकांना मृत्यू झाला.व ४० लोक जखमी झाले यात तीन वर्षाचे मूलेही होते. यावरून लोकामध्ये दोन समाजात आपसात भांडण लावण्याचा देशाला बदनाम करण्याचे हे प्रयत्न आहे. ज्यांनी जे कृत्य केले त्यांचेवर पोलीस विभागाने तात्काळ शोध घेवून कार्यवाही करावी तसेच त्या राज्याचे मुख्यमंत्री यांना कळवून कार्यवाही करण्याचे सूचीत करावे. व पाच लोकांचा मृत्यू झाला त्यांना श्रध्दाजंली अर्पन करावी.

श्री.संतोष खेंडके : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याच वेळी हैद्राबाद मधील बॉम्ब स्फोटात मृत्यू पावलेल्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री. संतोष खेंडके : महावितरण कंपनी या एमएसईबीच्या वतीने या सभागृहात ड्रम प्रोजेक्ट विषयी माहिती देणार आहे त्यासाठी त्यांना ठरावीक वेळ देवून माहिती घ्यावी.

मा. महापौर : देशात चार शहराची निवड करण्यात आली त्यात याशहराचे नाव आहे. या शहरासाठी केद्र शासंनाकडून १६७ कोटी रू. मिळालेले आहे. आणि आणखी १०० ते १२५ कोटी रू.मिळणार आहे. हा चांगला प्रोजेक्ट शहरात चालू होत आहे. सर्व पत्रकार व फोटोग्राफर यांनी खाली यावे परवानगी देत आहेत. या संदर्भात एमएसईबीचे श्री.शिदे व धनतोले साहेब माहिती देतील.

श्री.मो.जावेद मो. इसहाक:जो ड्रम प्रोजेक्ट आला यात उर्जा मंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांचे मोठे योगदान आहे. त्याचे सहकार्य झालेले आहे त्यांचे अभिनंदन करावे यानंतर माहिती देण्यास सुरूवात करावी.

श्री.सतीश कटकटे : या शहराचे खासदार श्री.चंद्रकातंजी खैरे यांनी सहकार्य केलेले आहे.

मा. महापौर :या प्रोजेक्टसाठी ज्या ज्या नेते मंडळीनी केंद्र शांसन असेल राज्य शासन असेल खासदार आमदार असतील व सर्व लोकप्रतिनिधी तसेच महानगरपालिकेचे नगरसेवक सुध्दा असतील. या सर्वांनी या प्रोजेक्टसाठी मदत केलेली आहे म्हणून या सर्वांचे अभिनंदन करण्यात येते. आता महावितरण कंपनीचे अधिकारी ड्रम प्रोजेक्ट बाबत सभागृहाला माहिती देतील.

याच वेळी महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री.धनतोले तसेच अधिक्षक अभियंता श्री.शिंदे साहेब यांनी ड्रम प्रोजेक्ट बाबत पावर पॉईन्ट प्रेजेन्टेशननुसार सभागृहाला माहिती दिली.

मा.महापौर : विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी यांनी अगाऊ कळवून सभागृहात आले. सर्वांना,पालिका सदस्यांना माहिती दिली, ड्रम प्रोजेक्ट काय आहे, सर्वांना कळाले. सभागृहातर्फे त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यांत येत आहे.

मा. महापौर : एक लक्षवेधी सूचना आहे. महापौर म्हणून मला व मा.आयुक्त यांना उद्येशून स.सदस्य श्री.अबूबकर अमोदी यांनी पत्र दिलेले आहे. ते सभागृहासमोर ठेवत आहे. नगरसचिव वाचून दाखवतील व त्यानंतर आपल्याला निर्णय घ्यायचा आहे.

नगर सचिव : स.पालिका सदस्य श्री.अबूबकर अमोदी यांनी मा.महापौर यांना दिलेले पत्र

प्रति,
मा.महापौर,
महानगरपालिका औरंगाबाद

विषय :- सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहण्याची परवानगी मिळणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणांस नम्रपूर्वक विनंती करण्यात येते की मी एमपीडीए अंतर्गत स्थानबध्द असल्याने मी सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकत नाही. शासन सक्षम न्यायालयात तर्फे सभेला उपस्थित राहण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता प्रयत्न चालू आहे .मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११ (ब) आणि कलम ११ (क) नूसार ३ व ६ महिने अनुक्रमे सभेला गैरहजर राहणे संदर्भात तरतूद आहे. व सभेला गैरहजर राहण्यासाठी महापालिकेने मान्यता देणे बाबत तरतूद आहे

तरी आपणांस नम्र विनंती करण्यात येते की मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ११ (ब) आणि कलम ११ (क) नुसार सभांना गैरहजर राहण्याची परवानगी देण्यास विनंती आहे.

सही/-
(अमोदी अबुबकर बिन सईद)
नगर सेवक वार्ड क्र.५२
इंदिरानगर बायजीपुरा औरंगाबाद

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : गैरहजर राहण्यास परवानगी देण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान (मामू) : श्री.अबूबकर अमोदी यांना पुढच्या सभेत येण्याची परवानगी द्यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : परवानगी देण्यात यावी.

मा. महापौर : कलम ११ (ब) नूसार तीन महिण्यासाठी सभेस गैरहजर राहण्याची मंजूरी देण्यात येत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: सहा महिण्याची परवानगी देण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे कलम ११ (क) नूसार सहा महिण्यासाठी सभेस गैरहजर राहण्यासाठी मूदत देण्यात येते.

**पत्रावरिल निर्णय :**

स.सदस्य श्री.अबूबकर अमोदी यांनी केलेल्या विनंती नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११ (क) अन्वये ६ महीने महानगरपालिकांच्या सभांना गैरहजर राहण्याची परवानगी देण्यात येते.

**चर्चा :**

श्री.मो.जावेद.मा.इसहाक : अगोदर चर्चा घेण्यात यावी त्यानंतर विषयपत्रिका घ्यावी.

मा. महापौर : अगोदर विषयपत्रिका घेणार आहोत चर्चेसाठी नंतर वेळ दिला जाईल. जाईल.

श्रीमती मेहरूनीस्सा खान: अगोदर चर्चा घेण्यात यावी.

याच वेळी मा. महापौर डायस समोर जनरल चर्चा अगोदर घ्यावी म्हणून अनेक स. सदस्य मागणी करतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा. महापौर : कुठल्याही नियमात चर्चा अगोदर घ्यावी म्हणून दिलेले नाही. विषय क्र १ वर बोलावे.

**विषय क्र. ८११/१ :**

दिनांक २२.०१.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : संपूर्ण सभांचे इतिवृत्त सादर केलेले आहे काय याचा खूलासा घेण्यात यावा.

नगरसचिव : दिं.२२.१.२००७ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे संपूर्ण इतिवृत्त सादर केलेले असून उर्वरीत सभांचे इतिवृत्त तयार नसल्याने दिलेले नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रत्येक मागिल सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त पूढील सर्वसाधारण सभेपूढे सादर करण्यात आले पाहिजे.ही पध्दत बरोबर नाही. उशीरा इतिवृत्त आल्यानंतर दोन जास्तीचे ठराव समावेश केले तर समजून येणार नाही.

मा.महापौर : कोणतेही ऐनवेळचे ठराव टाकलेले नाही. जे सभागृहात झाले तेच इतिवृत्तात येईल.सचिव यांनी मागिल सभांचे इतिवृत्त का दिलेले नाही याचा खूलासा करावा.

नगरसचिव :दिं. २२.१.२००७ रोजीचे संपूर्ण इतिवृत्त सादर केलेले असून विर्शेष सभा होती. त्यानंतरचे इतिवृत्त तयार झालेले नाही तयार झाल्यानंतर सादर केले जाईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मागिल सभेत झालेले निर्णय व त्यावर झालेली कार्यवाही बाबत पूढील सभेत माहिती दयायला पाहिजे ती दिली जात नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : नियमानूसार मागिल सभेचे इतिवृत्त पूढील सभेत कायम करण्यासाठी यायला पाहिजे. इतिवृत्त उशीरा देण्याचे कारण काय?

मा. महापौर : इतिवृत्त न देण्याचे कारण काय नगर सचिव यांना काय अडचण आहे खूलासा करावा.

नगरसचिव : सध्या नगरसचिवाकडे एक दैनिक वेतनावर लघुटंकलेखक असून दुसरे लघुटंकलेखकांनी इतिवृत्त घेण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामूळे इतिवृत्त तयार होणेस विलंब होत आहे.

श्री.किशनचंद तणवानी : कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल तर मागवून घ्यावे. कर्मचारी दिले जात नसेल व इतिवृत्त वेळेवर मिळत नसेल तर याला अर्थ नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :दोन वर्षापासून सतत मागणी करीत आहे की मागिल सभेत काय निर्णय घेतले त्याची माहिती पूढील सभेत आली पाहिजे. परंतू तसे होत नाही. सभा तहकूब करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :चार महिण्यानंतर इतिवृत सादर होते हे योग्य नाही.

मा.महापौर : सचिवाकडे कर्मचारी नाही ही अडचण आहे. परंतू आता त्यांना जो कर्मचारी पाहिजे त्याची यादी माझ्याकडे दयावी. मा.आयुक्तांना एक प्रत दयावी. आज किंवा उदयाच प्रशासनाने त्यांना आवश्यक कर्मचारी वर्ग देण्यात यावा.सभेतील जे ॲक्शन पॉईन्ट असतात ते इतिवृत्तासोबत दयावे. पुढच्या सभेत इतिवृत्त दिले जाईल. सात दिवस अगोदर इतिवृत्त दिले जाईल.

श्री.सलीम पटेल : दोन वर्षापूर्वी देखील कर्मचारी देणे बाबत सभागृहात चर्चा झाली होती. अदयाप का दिलेला नाही.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक २२.०१.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ८१२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका संचलित मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र,औरंगाबाद साठी ''मानद समन्वयक'' चे एक पद एक वर्षाच्या कालावधीसाठी रू.५,०००/- प्रतिमहा मानधन व करारपध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीसाठी जाहीरातीद्वारे बोलावण्यात आले.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीस हजर झालेल्या ९ उमेदवारांपैकी तोंडी मुलाखतीस पात्र ठरणाऱ्या ५ उमेदवारांच्या तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीच्यावेळी तज्ञ म्हणून माजी प्राचार्य श्री.मझहर मोहियोद्दीन, यांनाही बोलाविण्यात आले होते.

तोंडी मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या ५ उमेदवारांपैकी शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर बाबींचा विचार करून ''मानद समन्वयक'' या पदावर श्रीमती शबनूर बेगम मोहमंद अब्दुल बारी, यांची एक वर्षाच्या मानधन व करार पध्दतीवर निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड करण्यात आलेली आहे.

तसेच सर्वसाधारण सभा दि.२४.११.२००५ चा ठराव क्र.१०४/७ अन्वये गठीत केलेल्या समितीने मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी तयार केलेल्या नियमावलीप्रमाणे मानद समन्वयक -एक पद,लिपीक तथा ग्रंथालय सहाय्यक- एक पद,डी.टी.पी.ऑपरेटर (मराठी,हिंदी,उर्दू)- एक पद यासाठी मान्यता दिलेली आहे. सदर संशोधन केंद्र कार्यान्वित करणेसाठी लिपीक तथा ग्रंथालय सहाय्यक हे पद भरणे आवश्यक आहे. मुलाखतीस आलेल्या उमेदवारातून श्री.सिराज अहमद खान, यांची

निवड समितीने शिफारस करून त्यांना सहाय्यक समन्वयक हे पदनाम देवून एक वर्षाच्या रू.४,५००/- प्रतिमहा करारपध्दतीने नियुक्त करण्यास शिफारस केली आहे.

करिता निवड समितीच्या शिफारशीनुसार वरीलप्रमाणे दोन उमेदवारांना १२ महिन्याच्या करारपध्दतीवर नियुक्ती देण्यास तसेच यापूढे ही पदे करारपध्दतीने भरणे, नुतणीकरण करणे इ.चे अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : श्री.मझहर मोहियोद्दीन यांना कोणत्या विषयाचे तज्ञ म्हणून बोलविले होते. व ते कोणत्या विषयाचे तज्ञ होते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : हा विषय चर्चेचा नाही. तेथे मानद समन्वयक म्हणून नियूक्ती करायची आहे. प्रशासनाचा विषय आहे.

मा. महापौर : नगरसचिव खूलासा करतील.

श्री.रेणुकादास वैद्य : ते कोणत्या महाविदयालयाचे माजी प्राध्यापक होते. त्यांना कशासाठी बोलविले महानगरपालिकेत तज्ञ अधिकारी नव्हते का?

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४(१)प्रमाणे निवड समितीचे गठण केलेले होते. श्री.मझहर मोहियोद्दीन हे मौलाना आझाद महाविदयालयाचे अनेकवर्ष प्राचार्य होते,मौलाना आझादवर त्यांचा अभ्यास आहे. त्या निमित्ताने त्यांना अनुभवी म्हणून मुलाखतीच्या वेळेस बोलविले होते. निवड समितीमध्ये मा.आयुक्त,मुख्यलेखा परिक्षक तथा उपआयुक्त तसेच व्यवस्थापकीय संचालक व प्रकल्प अभियंता यांचा समावेश असून मुलाखतीच्या वेळी मा.आयुक्त स्वत: हजर होते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यासाठी निवड समिती नियुक्त केलेली होती. निवड समितीने दिलेला अहवाल मंजूर करण्यास हरकत नसावी. हा विषय मंजूर करावा.प्राचार्य श्री.मोहियोद्दीन बध्दल शंका घेण्याचे कारण नाही.

श्री.संजय जगताप : प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.प्रशांत देसरडा : हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. एक सदस्यीय समिती कधी ही नियुक्त करू नये. असे शासन वेळोवेळी सूचना करते. निवड समिती नियुक्त केल्याबध्दल प्रशासनांचे अभिनंदन करतो. ५७ पदाच्या भरतीसाठी निवड समिती केलेली नव्हती. श्रीमती शबनूर बेगम मोहमंद अब्दुल बारी यांची निवड केली त्यांचे कुणी नातेवाईक या महानगरपालिकेच्या सेवेत आहे काय याचा खूलासा करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : अशी चौकशी केल्यास प्रत्येक स.सदस्यांचा या महानगरपालिकेत कुणी तरी नातेवाईक असेल.

श्री.प्रशांत देसरडा : मंजूर करण्यास हरकत नाही परंतु मी जी सूचना केली माझी शंका दूर करावी. अधिकारी कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी यांचे शिक्षक कर्मचारी महानगरपालिकेच्या शाळेत आहे ते वेळेवर येत नाही.

मा.आयुक्त : मुलाखतीच्यावेळी मी स्वत: उपस्थित होतो. ६ उमेदवार मुलाखतीसाठी आलेले होते, श्रीमती शबनुर बेगम या उपस्थित उमेदवारात योग्य वाटले, त्यांची शैक्षणिक

पात्रता व योग्यता बघूनच निवड केलेली आहे. त्यांचे कुणी नातेवाईक आहे किंवा काय याची माहिती प्रशासनास नाही.

श्री.संतोष खेंडके : स्थगिती दयावी. कोणी नातलग आहे का.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: स्थगिती देवू नये. मंजूरी दयावी.

श्री.संतोष खेंडके : एकूण ९ उमेदवार आले होते त्यापैकी याचीच का निवड झालेली आहे.

मा. आयुक्त : सर्व उमेदवाराच्या मी स्वत: मुलाखती घेतलेल्या आहे योग्यतेच्या अधारे त्याची निवड झालेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरमध्ये सध्या बैठकाच होत आहे. कोणत्याही ॲक्टीव्हिटीज तेथे नाही. मौलाना अबुल कलाम आझाद येथेही असे होवू नये. तेथील कर्मचारी चांगला असावा. जर कुणाचा नातेवाईक तेथे ओळखीने सेवेत येत असेल तर तेथे काहीही काम करणार नाही.

मा.आयुक्त : स.सदस्यांच्या भावनेशी मी सहमत आहे परंतू मुलाखती घेतांना कोण कुणाचे नातेवाईक आहे हे समजलेले नाही. योग्यतेच्या अधारे निवड केलेली आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : एक वर्षासाठी नियुक्ती आहे. ठराव मंजूर करावा.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.किशनचंद तनवाणी : सर्व अधिकार आयुक्तांना का द्यायचे. ते अधिकार सभागृहाचे आहेत. सर्व अधिकार आयुक्तांना देत असेल तर सर्वसाधारण सभेला अर्थ नाही.

श्री.संतोष खेंडके : दुरूस्ती सह मंजूर करावा. आयुक्तांना अधिकार देवू नये.

मा. महापौर : या प्रस्तावातील खालचा परीच्छेद वगळून दुरूस्तीसह हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका संचलित मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र,औरंगाबाद साठी मानद समन्वयक या पदावर निवड समितीच्या शिफारशीनुसार श्रीमती शबनूर बेगम मोहमंद अब्दुल बारी, यांची एक वर्षाच्या मानधन व करार पध्दतीवर रू.५,०००/- प्रतिमहा मानधन व करारपध्दतीने नियुक्ती देण्यास मंजुरी देण्यांत येवून निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे श्री.सिराज अहमद खान,यांची सहाय्यक समन्वयक म्हणून रू.४,५००/-प्रतिमहा करारपध्दतीने एकावर्षासाठी नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, तसेच करारपध्दतीवर या पदाचे वेळोवेळी नुतणीकरण करणे/नियूक्ती करणे यासाठी सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८१३/३ :</u>**

दिनांक २८.०२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.७४९/२ नुसार झालेल्या निर्णयाप्रमाणे सदर प्रस्ताव दि.१७.४.२००७ रोजीच्या माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीपुढे सादर करण्यात आला असता सदर समितीचा ठराव क्र.१२ अन्वये मंजुरी दिलेली असून सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**<u>प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खाालील प्रमाणे आहे.</u>**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना रंगीत गणवेष ०२ जोड व पांढरा गणवेष ०१ जोड देण्यात आला आहे.

त्याच धर्तीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेष सहाय्य योजनेंतर्गत सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेष उपलब्ध करून द्यावयाचा आहे. महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्याबरोबर गणवेष उपलब्ध करून देणेबाबत सन्माननिय पदाधिकाऱ्यांच्या सूचना आहेत. सदर खरेदी ही सन २००७-०८ या वर्षात करावयाची आहे. त्यामुळे जून २००७ मध्ये गणवेष देण्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही चालू आर्थिक वर्षातच कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी यांनी लेखी दिलेल्या माहीतीनुसार विद्यार्थी संख्या २५११५ अशी दिली असून त्यामध्ये १०% नैसर्गिक वाढ विचारात घेवून त्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेषाचा लाभ देणेबाबत शिफारस केली आहे.

सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरिता गणवेष खरेदी करतांना गणवेषाचा दर्जा व गुणवत्ता उच्चतम असावी या हेतूने केवळ उत्पादक कंपन्याकडून निविदा मागवून साहित्य खरेदी करण्यात येणार आहे. सदर गणवेष खरेदी करीता अंदाजे खर्च रक्कम रू. १.२५ कोटी एवढा अपेक्षित आहे. पुढील आर्थिक वर्षात याकरीता आवश्यक तरतूद करण्यास्तव तसेच प्रस्ताव विचारार्थ सादर.

अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : एखादया वस्तुची भाववाढ होवून नैसर्गीक वाढ गृहीत धरणे योग्य आहे परंतू या प्रस्तावात मुलाची नैसर्गीक वाढ १० टक्के गृहीत धरलेली आहे. माझ्या वार्डातील शाळेत ५५० विदयार्थी होते २०० आहे. संख्या घटत चालली,शाळा एकत्रिकरण करून जेथे ५० विदयार्थी होते तेथे १५० दाखविले जात आहे. परंतू ज्या शाळा बंद झालेल्या आहेत त्याचा उल्लेख केलेला नाही. दुसरे असे की उर्दू माध्यमच्या ४ते७वी पर्यंतच्या विदयार्थीनींना पंजाबीड्रेस दिला जातो मराठीमाध्यमच्या मुलींना स्कर्ट देतो,हा भेदभाव कशासाठी करीत आहात.सर्वांना सारखाच गणवेश दयावा.

श्री.सतीश कटकटे : मराठी माध्यच्या मूलींना सुध्दा पंजाबी ड्रेस देण्यात यावे.

मा. महापौर : स.सदस्य श्री.संजय सिरसाट यांनी केलेल्या सूचनेनूसार मुलींना स्कर्ट न देता पंजाबी ड्रेस देण्यात यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : तीन गणवेश वाटप करणार आहे परंतू विदयार्थ्यांना बुट देणार की नाही याचा उल्लेख नाही.

मा. महापौर : १५ ऑगस्ट पूर्वी गणवेश व बुट विदयार्थ्याना देण्यात यावे अशी सूचना प्रशासनास देण्यात येत आहे.

श्री.देसरडा प्रशांत : मागिल वर्षीही बुट देण्याचे मान्यता दिली ते केंव्हा देण्यात आले खूलासा घ्यावा.

प्र.मुख्यलेखाधिकारी : नोव्हेंबर महिण्यात बुटाचे वाटप करण्यात आलेले आहे.

श्री.सय्यद खुसरो : कोणत्या कॉलीटीचा , व कंपनीचा कपड घेणार आहे. माहिती घ्यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मुख्यलेखाधिकारी वाटपाचे काम नियमानुसार करू शकतात का ज्या विभागाचे काम आहे त्यांचेकडेच हे दयावे.बजेट आहे की नाही एवढेच लेखा विभागाचे काम असते. संबंधीत विभाग ज्यांचेकडे आहे, त्यांना बोलवावे.

मा. आयुक्त : गणवेश खरेदी भांडार विभागाकडून होते. पूर्ण प्रोसेस लेखा विभाग करते. विकत घेतल्यानंतर ते मुख्याध्यापक यांना देवून ते त्या त्या वार्डातील सदस्यांना बोलवून त्यांचे हस्ते गणवेशचे वाटप करतात.

श्री.रविकांत गवळी : १५ ऑगस्ट पुर्वी गणवेश वाटप केले जाईल असे सांगण्यात येते परंतू दोन वर्षापासून १५ ऑगस्ट २६ जानेवारी पुर्वी गणवेशचे वाटप झालेले नाही. ५० लक्ष चे बजेट १ कोटी केले. उन्हाळयाच्या सुट्टी लागणार आहे अदयाप बुट सॉक्स दिले नाही. संबधीत एजन्सीकडून चागंल्या कॉलीटीचे गणवेश देवू म्हणून १०० रू. च्या बाँडवर त्यांनी लिहून दिलेले आहे. सॉक्स मिळाले नाही. मागिल वेळी गुजरात मध्ये मोठी वृष्टी झाली त्यामूळे गणवेश देण्यास उशीर झाला असे कारण दाखविले जात होते. नामाकींत कंपनीचे गणवेश ,बूट घ्यावे कॉलीटी चांगली राहिल. गुणवत्ता चांचणी करण्याची गरज नाही.

श्री.वसंत नरवडे : गुणवत्ता चांचणी मध्ये गुणवत्ता दिसून आली नसेल तर संबधीत एजन्सीची १० टक्के रक्कम थांबवून ठेवणार होतो ती कार्यवाही केलेली आहे की नाही. गणवेश बुट व सॉक्स माझया माहिती प्रमाणे एजन्सीला पुरवठा करण्यासाठी एक महिण्याची मुदत दिली होती ते किती दिवसानंतर पुरवठा झाला. सभागृहाची दिशाभूल करू नये. मागिल वर्षाचे बुट मिळालेले नाही संबधीतावर दंडात्मक कार्यवाही केली का. एक वर्ष बुट मिळाले नाही यास जबाबदार कोण ?अजुनही बुट पडलेले आहे. प्रत्यक्षात ही सर्व कार्यवाही वेळीच होत असेल तर करावे नसता यात सर्वांना अडकवू नये.

श्री.दत्ताभांऊ पाथ्रीकर : अशी परीस्थिती असेल तर संबधीत विभागातील कर्मचारी काय काम करतात.

श्री.विनायक पांडे : १५ ऑगस्ट पूर्वी शालेय विदयार्थ्यांना गणवेश मिळाले नाही तर त्याची जबाबदारी आताच निश्चित करावी.

सौ.खान अजरा जबीन : गणवेशची माप बरोबर नसते. १२ वर्षाच्या मुलांना ४ वर्षाचे मुलांचे गणवेश दिले जाते. या देशाची जी संस्कृती आहे त्यानूसार मुलींना पुर्ण गणवेश व योग्य मापाचा देण्यात यावा. महानगरपालिकेच्या विदयार्थ्याची संख्या माझ्या वॉर्डात ३० ते ४० टक्के या वर्षी वाढलेली असून १५ ऑगस्ट पूर्वी गणवेश देण्याची कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : विदयार्थ्यी उपस्थिती संख्या ६०,६०,७५ असे दाखवून डिमांड केली जाते. परंतू प्रत्यक्षात शाळेत १२ ते १५ विदयार्थ्याना गणवेश दिल्या जाते. लेखा परीक्षण अहवालाच्या वेळी भांडार विभागास विचारणा केली असता १०० गणवेश शाळेत दिले गेले असे सांगण्यात आले. तर उर्वरीत गणवेश कूठे जात आहे असा प्रश्न पडतो. ५० टक्के मागणी होते त्यातून ३० टक्के गायब होते. कुणावर जबाबदारी नाही प्रत्येक शाळेत १२-१५ विद्यार्थ्यांना गणवेश दिला जातो. त्यांचे फोटो घेतले जाते. व नंतर गणवेश वाटप योग्यप्रकारे होत नाही. विचारणा केली तर,७२ दिले म्हणतात. प्रत्यक्षात १८ देतात. वॉर्ड क मध्ये सर्व वाटप झाल्याचे दाखवतात, परंतु वाटप झालेले नाही. यासाठी एक कमेटी नियुक्त करून शिक्षण समितीचे सदस्यही राहतील. जे की विदयार्थ्यांना भाडांर विभागाकडून गणवेश वेळेवर मिळाले पाहिजे.

श्रीमती अजरा खान : चांगल्या प्रतीचा कपडा नसतो. दोन महिण्यानंतर तो गणवेश वापरू शकत नाही शिलाई बरोबर नसते. कोणत्या शाळेत किती गणवेश व बुट दिले गेले या बध्दल

माहिती विचारलेली होती,अदयाप आलेली नाही. बुट शेवटच्या महिण्यात वाटप केले ते ही पूर्ण विदयार्थ्यांना नाही.

मा.महापौर : योग्यवेळी गुणवत्ता व योग्य संख्येत वाटप झाले पाहीजे व त्याचा आकारही बरोबर असावा.

श्री.प्रशांत देसरडा :शिक्षण समितीचा मी सदस्य होतो. सभागृहात चर्चा झाल्यानंतर मा. आयुक्त यांनी दखल घेवून लगेच विभाग प्रमुखांना शाळेवर पाठवले होते. संखया कमी व मागणी जास्त होते म्हणून आरोप होतात. त्यासाठी पाच पदाधिकारी तीन उपआयुक्त यांचे हस्ते गणवेश वाटप झाले पाहिजे. लक्षात येईल की नेमकी विदयार्थी संख्या किती?खादी ग्रामद्योग हे शासनाचे आहे.तेथून पर्चेसिंग करावे कॉलीटीचा प्रश्न येणार नाही. मागिल दोन वर्षापूर्वी हर्सूल जेल मधून चटाईची मागणी केली होती चांगल्या प्रतीच्या होत्या परंतू त्या नालगुडी होत नाही म्हणून घेतलेल्या नाही.

मा. महापौर : आपली सूचना लक्षात आली. एवढ्या विदयार्थ्यांना वाटण्यास वेळ लागेल त्यासाठी पदाधिकारी आणि काही नगरसेवक अशी कमेटी करून कमेटी बरोबर उपआयुक्त राहतील.त्या प्रमाणे वाटप केले जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य : गणवेशचा दर्जा गुणवत्ता व उच्चतम असावा यास हरकत नाही. परंतू उत्पादक कंपन्याकडून निविदा मागवून साहित्य खरेदी करण्यात येणार असे दिले आहे. नुसता कपडा घेणार की कंपनीकडून गणवेश तयार होवून येणार आहे याचा खुलासा होत नाही.

श्री.अ.रशिद खान : आजपर्यत स्थायी समितीच्या मान्यतेने गणवेशचा कपडा घेण्यात आलेला आहे. तो बरोबर नव्हता काय ?

श्री.नरवडे वसंत :मागिल वर्षाचे गणवेश पूर्ण एमएसआरडीसी कडून घेतले. त्यांनी ठेकेदारांना चार टक्केनी काम दिले.अशा संस्थाना काम देवून जर ते इतर लोकांकडून करून घेत असतील व वेळेवर देत नसतील तर यास जबाबदार कोण असणार आहे. आपली फसवणूक होत असेल तर,खूलासा करावा.

मा. आयुक्त : कंपनीकडून पूर्ण गणवेश बनवून घेणार आहोत. थोडा जास्त प्रमाणात खर्च वाढेल डायरेक्ट कंपनीकडून घेण्याचा मानस आहे. कंपनी १५० असेल. नामवंत कंपनीकडून घेण्याचा विचार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : कपंनीकडून मिळत असेल तर कॉलीटी चांगली मिळेल तसेच गणवेश वेळेवर मिळाला पाहिजे. अशी सर्वांचीच भावना असते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मुलींना पंजाबी ड्रेस देण्याचा आपण निर्णय घेतला त्याबध्दल सर्वांचे धन्यवाद देतो. प्रत्येक वर्षी गणवेश घ्यावा लागतो. त्यासाठी कंपनीकडे रेट निश्चित करून घ्यावे. कमी किमतीत गणवेश पडेल. टेंडर काढण्याची गरज पडणार नाही तसेच लेखा परीक्षणातही तृटी येणार नाही. गणवेश वाटप करतांना त्या त्या वार्डातील स. सदस्यांना बोलविण्यात यावे.

श्री.सतीश कटकटे : गणवेश बरोबर नाही म्हणून शिक्षण समिती मध्ये चर्चा झाली होती. मा. आयुक्त यांनी सर्व विभाग प्रमुख यांना शाळेवर चौकशीसाठी पाठविले होते. त्याचा काय

अहवाल आलेला आहे माहिती नाही. गणवेश कपडा खराब असेल तर संबधीत एजन्सीवर कार्यवाही करू असे मा.आयुक्तांनी जाहीर केले होते.

मा.आयुक्त : नोटीस काढली एमएसआयडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकाला अर्धशासकीय पत्र पाठवले की, त्यांना यापूढे एमएसआयडीसी ने काम देवू नये.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : लेखाधिकारी यांचेकडे कोणकोणती कामे आहेत प्रत्येक साहित्य लेखाधिकारी खरेदी करीत असेल तर सर्व कामे वेळेवर होतील का?.

मा. आयुक्त : भांडार विभाग अनेक साहित्य खरेदी केले जाते. भांडार विभागाचे प्रमुख म्हणून लेखाधिकारी आहे. पूर्वी हे साहित्य प्रत्येक विभाग प्रमुख आपआपल्या परीने खरेदी करीत होते आता ते एकत्रीत करून भांडार विभागामार्फत खरेदी करतो ते पून्हा स्वतंत्र करायचे असेल तर तसा निर्णय घेवू शकतो. सध्या ९० टक्के खरेदी ही भांडार विभागाकडूनच होते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : वेगवेगळे विभाग महापालिकेत आहे. इतर महानगरपालिकेच्या व्यतिरिक्त येथे कामकाज होवू नये. डिसेन्ट्रलाईजेशन करावे करप्शन कमी होईल.

मा. आयुक्त : डिसेंन्ट्रलाईज करायला पाहिजे परंतु माझा अनुभवा प्रमाणे फारशा महापालिकामध्ये डिसेन्ट्रलाईज असल्याने कन्ट्रोल रहात नाही. सेन्ट्रलाईज केलेले आहे.सभागृहाची भावना असेल तर काही प्रमाणात डिसेन्ट्रलाईज करण्याचा आपण प्रयत्न करू यामूळे होते असे की प्रत्येक विभाग भांडार विभागास पत्र लिहितात व एकत्रित टेंडर मागवतात. प्रायोगिक तत्वावर काही विभागाचे डिसेन्ट्रलाईज करण्याचा प्रयत्न करू.मागिल वर्षी जे सॅम्पल आपल्याकडे आले होते ते तपासणीसाठी मुंबई येईल लॅब मध्ये पाठविले होते. रिपोर्ट आल्यानंतर मुख्याधयापकाकडून यादी मागविली होती. त्यांनी वाटप केले. जेंव्हा प्रशासनाकडे तक्रार आली तेंव्हा विभाग प्रमुखांना तपासणी करण्यासाठी पाठविले होते. शिलाई केलेली होती ती योग्य नव्हती. एमएसआयडीसी ही शासनाची संस्था आहे. त्यांना आपण ऑर्डर दिली होती त्यांनी ज्या एजन्सीकडून पुरवठा मागविला त्या एजन्सीला त्यांनी काळया यादीत समावेश करावा असे लेटर एमएसआडीसीला महापालिकेने दिले होते.

श्री.सतीश कटकटे : एमएसआयडीसीला महापालिकेने ऑर्डर दिली होती. पुरवठा त्यांनी केलेला आहे. कपडे बरोबर नाही म्हणून त्यांचेवर काय कार्यवाही केली.

मा.आयुक्त :एमएसआयडीसी ला जेंव्हा पत्र दिले तेंव्हो त्याचे अधिकारी येथे येवून त्यांनी बऱ्याच शाळामध्ये जावून तपासणी केली. त्यानंतर एमएसआयडीसीला डीओ लेटर दिले की जो पूरवठा केला त्या कंपनीला आपण काम देवू नये व काळया यादीत समावेश करावा. १०% रक्क्म आपण दिलेली नाही.

श्री.संतोष खेंडके : वितरण करण्याची विभागाची जबाबदारी आहे. शिक्षणाधिकारी ऐकत नाही. कोणासह चौकशी करावी, कोणाला विचारावे. या बाबतीत जबाबदारी निश्चित करावी विदयार्थ्यांना पूर्ण गणवेश व वेळेवर देण्याची कार्यवाही करणेच्या सूचना कराव्यात. ४ थी इयत्ता पुढील विद्यार्थीनींना पूर्ण ड्रेस देण्यांत यावा. मुलांना वेळेवर गणवेश द्यावे. योग्य साईजचे असावे.

श्री.मुजीब खान : शिक्षणाधिकारी यांचेकडे खर्चाची व गणवेश वाटप करण्याची संपूर्ण जबाबदारी दयावी. लेखाधिकारी यांचेकडे भांडार विभाग आहे. वेळेवर गणवेश द्यावे. शिक्षणाधिकारी यांचेवर स्वतंत्र जबाबदारी टाकावी.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता शिक्षणाधिकारी यांनी शाळेत वेळेवर गणवेश पाठवून १५ ऑगस्ट पूर्वी विदयार्थ्यांना गणवेश मिळतील,अशी कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खान : शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे.गणवेश दिले जाते तर शाळेचा दर्जाही सुधारला पाहिजे. पुणे मुबईच्या महनपाच्या शाळेत प्रवेश घेणाराची संखया मोठया प्रमाणात आहे त्याप्रमाणे येथे झाली पाहिजे..शाळेत बसण्यासाठी बेंन्च नाही,आसन पट्ट्या नाही. पाणी गळते याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.वसंत नरवडे : मागिल वर्षीचे बुट,सॉक्स किती शिल्लक आहे किती वाटप केले अहवाल मागवावा.

मा. महापौर : मागिल वर्षी किती बूट सॉक्सची मागणी केली होती. काही विदयार्थ्यांना मिळालेले नाही,किती शिल्लक आहे,याचा अहवाल पुढील वेळेस शिक्षण समिती मार्फत देण्यांत यावा. हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेष खरेदी करतांना गणवेषाचा दर्जा व गुणवत्ता उच्चतम असावी, या हेतूने केवळ उत्पादक कंपन्याकडून निविदा मागवून साहित्य खरेदी करण्यांत यावे, तसेच इयत्ता ४ थी ते ७ वी पर्यंतच्या मराठी माध्यमातील विद्यार्थीनींना स्कर्ट ब्लाऊज ऐवजी उर्दू माध्यमातील विद्यार्थीनीप्रमाणे शर्ट व सलवार पुरविण्यांत यावेत. तसेच मागील वर्षाप्रमाणे महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक जोड काळा रेग्झीन शुज व पांढरा कॅन्व्हास शुज तसेच नेक टाय व पांढऱ्या व ग्रे रंगाचे पायमोजे पुरविण्यांत यावेत. त्याकरीता आवश्यक आर्थिक तरतूदीस व साहित्य खरेदीस सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१४/४ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मे.बी.डी.ए.लिमिटेड, औद्योगिक वसाहत,चिकलठाणा,औरंगाबाद विरूध्द औरंगाबाद महानगरपालिका यांनी समरी सुट क्रमांक ०२/२००३ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक १६.१०.२००६ रोजी दिलेल्या निर्णया विरूध्द महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात सिव्हील अपील क्रमांक १६१/२००७ अन्वये अपील दाखल केले होते.

सदर प्रकरणामध्ये मे.बी.डी.ए.लिमिटेड,चिकलठाणा,औरंगाबाद या मद्य निर्मिती करणाऱ्या कंपनीने अल्कोहोल या मालावरील जकातीच्या दरासंबंधी दिनांक १२.०३.१९९३ रोजी आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांचे सोबत करारनामा केलेला होता. सदर करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे मे.महाराष्ट्र डिस्टलरीज या कंपनीची मा.उच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक १०८६/८६ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ झालेले होते.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२.०१.१९९६ रोजी वरील प्रकरणात महानगरपालिकेच्या बाजूने कंपनीच्या आयात मालावर ५% दराने जकात वसूलीत आदेश दिल्यामूळे संबंधित कंपनीकडून आयुक्त,

महानगरपालिका यांनी कंपनी सोबत केलेला करारनामा (Agreement) दिनांक १२.०३.१९९३ मधील तरतुदीप्रमाणे कार्यालयामार्फत 'अल्कोहोल' या मालावरील जकात दरातील फरक ३.५% प्रमाणे जकातीच्या फरकाची रक्कम रूपये १.१३ कोटीचे डिमांड बील कंपनीस देवून सदर रक्कम भरणा करण्या विषयी नोटीस देण्यात आलेली होती. सदरील नोटीसच्या विरोधात कंपनीमार्फत Special Civil Suit No.233/96 अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २२.०१.१९९६ रोजीच्या निर्णया विरूध्द महाराष्ट्र डिस्टलरीज या कंपनीने मा.सर्वोच्च न्यायालयातील आय.ए.नं.०२ मधील सिव्हील अपील क्रमांक ५३४१/९६ मध्ये दिनांक १७.१२.२००४ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे व महानगरपालिकेने कंपनी सोबत दिनांक १२.०३.१९९३ रोजी केलेल्या करारनाम्याप्रमाणे कंपनीमार्फत जास्तीची भरणा केलेली जकात फरकाची रक्कम व त्यावरील व्याजासह एकूण रक्कम रूपये १,९५,८७,७८८/- परत करण्यासाठी कंपनी मार्फत प्रथम अपील क्रमांक ०७/२००७ आणि सिव्हील अपील क्रमांक १६१/२००७ अन्वये प्रकरण पुन्हा नव्याने न्यायप्रविष्ठ केलेले होते.

सदरील सिव्हील अपील क्रमांक १६१/२००७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२.०२.२००७ रोजी प्रकरण ॲडमिट करून मा.दिवाणी न्यायधिश (वरिष्ठ स्तर) यांच्या निर्णयास स्थगीती दिलेली आहे. तथापी सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने औरंगाबाद महानगरपालिकेस ११ समान हप्त्यामध्ये रूपये २,२०,००,०००/- मा.उच्च न्यायालयात जमा करण्याचे निर्देश देवून पहिल्या हप्त्याची रक्कम दिनांक ३०.०४.२००७ पूर्वी जमा करण्याचे आदेश दिलेले आहेत.

वरील दर्शविल्याप्रमाणे आणि मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १२.०२.२००७ रोजीच्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेतर्फे ११ समान हप्त्यामध्ये रूपये २,२०,००,०००/- (अक्षरी रूपये दोन कोटी वीस लाख फक्त) मा.उच्च न्यायालयात जमा करण्याच्या पहिल्या हप्त्याची रक्कम दिनांक ३०.०४.२००७ पूर्वी जमा करणे अनिवार्य असल्या कारणाने सदरची रक्कम सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : ५ टक्के प्रमाणे करारनामा केला होता. प्रशासनाने पाच टक्के ऐवजी २ टक्केचा पत्रव्यवहार झाला का. सरळ मा.न्यायालयात प्रकरण गेले. महापालिकेच्या वतीने जे वकील नियुक्त केले त्यांनी या प्रकरणात कोणतेही कागदपत्र न्यायालयात दाखल केलेले नाही जर महापालिकेकडे ५ टक्के प्रमाणे करारनामा केलेला असल्याचा पूरावा सादर केला असता तर मा. न्यायालयाने महापालिकेच्या विरोधात असा निकाल दिला नसता. यात संगणमत झाल्यासारखे वाटते. अपील करावे पैसे देवू नये.

मा. आयुक्त : अपील मध्ये गेलो आहे. मा.न्यायालयाने रक्कम कोर्टात जमा करावी म्हणून आदेशीत केलेले आहे.

श्री.मुजीब खान : जेष्ठ अनुभवी वकील या शहरात आहे. त्यांना मा.आयुक्तांनी बोलावून चर्चा करावी. मा.न्यायालयात रक्कम भरणा करण्याची गरज पडणार नाही. महानगरपालिकेने तसा करारनामा केलेला आहे. ही रक्कम शहराच्या विकास कामासाठी उपयोगात येईल.

श्री.रविकांत गवळी : मे बी.डी. ए लिमीटेड चिकलठाणा व औरंगाबाद मनपा यांचेत करारनामा झाला होता. त्याप्रमाणे ५ टक्के जकात वसूल केली. त्याचे ३.५ टक्के झाले. त्याबध्दल महानगरपालिकेने काय कार्यवाही केली.

श्री.वसंत नरवडे : हा प्रश्न सन १९९३ व १९९६ काळातील असून त्यावेळी सर्वसाधारण सभा किंवा मा. आयुक्तांनी जर निर्णय घेतले असतील आणि त्या संबधीचा कागदपपत्राचा पाठपूरावा केला नसेल,कारण यात दिलेले आहे की, दि.२२.१.१९९६ रोजी वरील प्रकरणात महापालिकेच्या बाजूने कंपनीच्या आयात मालावर ५ टक्के दराने जकात वसुलीत आदेश दिल्यामूळे संबधित कंपनीकडून आयुक्त महापालिका यांनी कंपनी सोबत केलेला करारनामा दि १२.३.१९९३ मधील तरतुदी प्रमाणे कार्यालयामार्फत अल्कोहोल या मालावरील जकात दरातील फरक ३.५ टक्के प्रमाणे जकातीच्या फरकाची रक्कम रूपये १.१३ कोटीचे डिमांड बील कंपनीस पाठविले त्यावेळचा घेतलेल्या निर्णयाची प्रत काढावी त्यावर काय अपील केले ते पहावे नसता चांगले वकील मार्फत मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करावे. २.२० कोटी रू. जनतेचे जाणार आहे. विकास कामावर याचा फरक पडणार आहे.कशाच्या अधारे निर्णय घेतला होता. एकूण ११ हप्त्यात रक्कम भरणा करायची आहे दि.३०.४ २००७ पूर्वी पहिला हप्ता भरायचा होता पाचवा महिणा चालू आहे.उशीरा प्रस्ताव येतो हे बरोबर नाही.

श्री.देसरडा प्रशांत : ज्याकंपनीने करारनामा केला त्यानूसार मा. उच्च न्यायालयात महापालिका बाजूने निकाल दिला. सदर कंपनी या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागीतली व निकाल महापालिकेच्या विरोधात गेला. व कोर्टाने असे आदेशीत केले की रक्कम जमा करावी. डिस्टीलरीज कंपनीचा निर्णयाप्रमाणे पैसे मागतात. त्यावेळचे आयुक्त श्री.भोगे साहेब होते संचिका बघावी. त्यावेळीही ही प्रकरण कोर्टात चालू होते.संबधीत कंपनीने ५ टक्के दराने जकात आकारली त्याच वेळेस सदर कंपनीने ग्राहकाकडून त्यांचे दर वाढवून वसूल केले. इनकम टॅक्स,सेलटॅक्स कार्यालयाकडून माहिती घ्यावी. महानगरपालिकेला सदर कंपनीने रक्कम दिलेली आहे ती बॅलेन्ससिटमध्ये कूठे आहे ते तपासावे. परंतू एवढी मोठे प्रकरण उच्च न्यायालय सर्वोच्च न्यायालयात चालते. परंतू त्यावेळचे जकात अधिक्षक उपआयुक्त यांनी इनकम टॅक्स व सेल टॅक्स कार्यालयास जावून चौकशी केली नाही की ज्या दराने महापालिका रक्क्म घेत आहे ती च रक्कम संबधीत एजन्सी ग्राहकाकडून घेते की नाही याची तपासणी अधिकाऱ्यानी केली नाही. जर चौकशी केली असती तर खात्रीने सांगतो की ज्या प्रमाणे मा.उच्च न्यायालयात महापालिकेच्या बाजूने निकाल लागला त्यावेळी कापडीया ॲडव्होकेट हे महापालिकेच्या बाजूने होते. प्रशासनाने कुठेतरी हलगर्जीपणा केला व मा. सवोच्च न्यायालयात महापालिकेच्या विरोधात निकाल गेला. कोर्टाचे आदेश हे सभागृहाला मान्य आहे परंतू रक्कम भरायची की नाही याची लिगल चौकशी करावी लागेल. या प्रकरणी संचिका बघीतली तर जाणूनबूजून मा.सर्वोच्च न्यायालयात ऐनवेळेस वकील बदलले त्यामूळे महापालिकेच्या विरोधात निकाल गेलेला आहे..असे दिसून

येईल. तत्कालीन आयुक्त श्री.भोगे साहेब यांनी दिलेले निर्देशाप्रमाणे संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही का केलेली नव्हती. याची चौकशी झाली पाहिजे. असा प्रकार यापूढे होवू नये यासाठी सदर प्रकरणाची संचिका सील करावी जर संबधीत अधिकारी यांनी मा.आयुक्तांचे आदेश पाळले असते तर मा.सर्वोच्च न्यायालयात या महापालिकेच्या विरोधात निकाल आला नसता. मा.सर्वोच्च न्यायालयात महापालिकेच्या वतीने जे वकील होते त्यांना पॅनलवर घेवू नये म्हणून येथील मा.उच्च न्यायालयाचे जे वकील होते त्यांनी म्हटले होते याची सूध्दा चौकशी करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : प्रथम हे प्रकरण १९८६ मा. उच्च न्यायालयात दाखल झाले होते. शेडयूल ओ मध्ये अल्कोहोलवर ५ टक्के जकात आहे. आज तेच दर आहे तर कंपनीला रक्कम परत करण्याची वेळ का आलेली आहे. १९८३ जेंव्हा याचिका दाखल झाली त्याचे काय झाले खूलासा घ्यावा. दि.१६.१०.२००६ रोजी मा.उच्च न्यायालयात सिव्हील अपील क्रमांक १६१/२००७ अन्वये अपील दाखल केले होते. सन २००६ मध्ये दाखल केले तर १९८६ चा उल्लेख करण्याची काय गरज होती त्यात कोणता बेस होता. १९८६ च्या दाव्यात मा. उच्च न्यायालयाचा काय निर्णय झालेला आहे.तसेच दुसरा परिच्छेद मध्ये मे. बी.डी.ए लिमिटेड चिकलठाणा औरंगाबाद या मद्य निर्मिती करणाऱ्या कंपनीने अल्कोहोल या मालावरील जकातीच्या दरासंबधी दिनांक १२.३.१९९३ रोजी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद याचे सोबत करारनामा केलेला होता सदर करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे मे महाराष्ट्र डिस्टलरीज या कंपनीची मा.उच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक १०८६ /८६ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ झालेले आहे. असे दिले आहे १९९३ ,१९८६, २००६,२००७ मधील याचिकेचे काय झाले.त्यावेळी श्री.भोगे साहेब होते. मद्य निर्मित अल्कोहोल यावर ५ टक्के जकात आकारली जात होती शेडयूल ओ मध्ये आहे तर पैसे देण्याची वेळ का आली. महापालिकेस १.१३ कोटी मिळाले. १.९५ कोटी व व्याजासहीत २.२० कोटी दयावे लागत आहे. १ कोटीचे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे त्यास कोण जबाबदार महापालिकेचे यात नुकसान होत असून शहरातील नागरीकांचा हा पैसा आहे. १९८६ ला जेंव्हा याचिका दाखल केली त्यावेळी हाशमी साहेब जकात अधिक्षक होते. त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने सुध्दा शेडयूल ओ प्रमाणे या वर ५ टक्के जकात वसूली करावी म्हणून निदेशीत केले होते. असे असतांना आज रक्कम देण्याची वेळ का आली आहे. १.१७ कोटी घेतले २.२० कोटी भरण्याची वेळ येते यास जबाबदार कोण?जेंव्हा पासून महापालिका अस्तित्वात आली तेंव्हा पासून अल्कोहोलवर ५ टक्के जकात घेत आहोत. यास कोण जबाबदार आहे याची चौकशी निवृत्त न्यायधिश श्री.चपळगावकर साहेब यांचेकडून करावी.

मा. महापौर : ऑलरेडी मा. उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे व २.२० कोटी भरावे म्हणून आदेशीत केलेले आहे. हा एक विषय झाला.

श्री.अ.साजेद अ. सत्तार :शेडयूल ओ मध्ये काय दर होते. त्या प्रमाणेच वसूल केलेले आहे. कोणतीही कपंनी १ कोटी रक्कम कुणालाही दान देवू शकत नाही. नियमाने वसूली झालेली आहे. त्यावेळी कंपनीने जे पैसे भरणा करायचे ते केले. आताच आपले अधिकारी हे कंपनीला २.२० कोटी देण्याचे करीत आहे. मा.न्यायालयाचे आदेशाचा आदर आम्ही करतो, मा.चपळगांवकर यांचेमार्फत चौकशी करावी.

मा. महापौर :१९८६ते१९९६ व २००६ ते २००७ पर्यंतच्या कार्यकाळात महानगरपालिकेच्या माध्यमातून कोणत्या अधिकाऱ्याकडून दिरंगाई झालेली आहे काय? सभागृहात झालेल्या चर्चेतून कोणता वकील ऐनवेळी बदलले याची व मागणी केल्यानूसार या सर्व प्रकरणाची चौकशी मा. निवृत्त न्यायमूर्ती श्री.चपळगावर साहेब यांना चौकशीसाठी विनंती करण्यात येईल. २.२० कोटी रू. भरावयाचे आहे यावर चर्चा करावी.

श्री.संजय सिरसाट : २.२० कोटी रू. ११ हप्त्यात भरणा करायचे आहे ते भरणे आवश्यक आहे, मा.न्यायालयाचे आदेश आहे. असेच,एक प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात होते. मा.सर्वोच्च न्यायालयात तारखेस हजर नव्हतो. त्यावेळी शर्मा साहेब आयुक्त होते. त्यांनी लगेच रिव्हीजन पीटीशन दाखल केले. त्यावेळी ही मा.सर्वोच्च न्यायालयात महापालिकेचे वकील हरले. मा.सर्वोच्च न्यायालयाचे जजमेंन्ट हा एक कायदा असतो त्याची अमबजावणी करणे हे आपले काम आहे. कंपनीला सांगण्यात आले की ५ टक्के दराने पैसे जमा करावे नसता ताळा लावू. त्यानंतर ती कंपनी ॲग्री झाली. त्यावेळी श्री. गारे साहेब आयुक्त होते. नरेद्र पाटील सदस्य होते. यांनी करारनामा केला की कंपनी कोर्टात जात आहे कोर्टाचा निर्णय आम्हाला मान्य राहिल कंपनीचे जेही पैसे फिरतील ते परत केले जातील. अनेक वर्ष लोटले. कंपनीची जी मूळ रक्कम होती ती आपण दिली नाही. कपंनीचे ३ ते ३.५० कोटी रू. आले असतील त्याचे व्याजासह ५.५० कोटी रू. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानूसार दयावे लागले.महापालिकेच्या हट्टापायी ५.५० कोटी भरणा करावे लागले. त्याचपध्दतीने ही दुसरे प्रकरण समोर आलेले आहे. मा.हायकोर्टात वकीलाने म्हटले सारखेच प्रकरण आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने जजमेन्ट दिलेले आहे त्या अधारे या याचिकेचा निकाल दयावा. त्यामूळे निकाल लागलेला आहे पैसे परत करण्याची वेळ आलेली आहे. १० ते ११ हप्त्यात रक्कम भरणे आवश्यक आहे. पुन्हा दुसरी प्रोसेस सुरू होते. ठरलेला पॅटर्न असतो. वकील लावणार कोर्ट फिस भरणार दीड लक्ष एक लक्ष वकीलास देणार चार लक्ष खर्च करून ही निकाल महापालिकेच्या बाजूने येणार नाही. पुन्हा कोर्टाचे आदेश येतील त्याचे पालन करावे लागेल व यावर पून्हा आणखी व्याज वाढणार व नागरीकांच्या पैशातून ते दयावे लागणार. एखादया कामाचे मा.आयुक्त त्यांचे अधिकारात वाटाघाटी करतात. या कंपनीला मा.आयुक्तांनी वाटाघाटीसाठी बोलवावे जर मुळ रक्कमेवर किंवा या एकूण रक्कमेवर २० ते ३० लक्ष कमी होत असेल तर करायला हरकत नसावी. जेष्ठ वकील यांचेशी चर्चा करून या प्रकरणात काय केले पाहिजे त्यांचे मत घ्यावे. सल्ला घेवून वाटाघाटीने कार्यवाही केल्यास महानगरपालिकेचे ३० ते ३५

लक्ष रू. देण्याची गरज पडणार नाही. या प्रकरणात जवळपास ६ टक्कने व्याज देत आहोत. यात ३७ लक्ष रू. व्याजापोटीचे आहे. जेष्ठाचा सल्ला घेवून वाटाघाटी करणे योग्य की अयोग्य मत घ्यावे व महापालिकेचे ३० ते ३५ लक्ष रू. वाचवू शकतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : १.१३ कोटी घेतलेले आहे. २.२० कोटी देत आहोत.व्याज हे १.०७ कोटी जास्त दिले जात आहे. हे प्रकरण असे आहे की चिकलठाणा भागात महाराष्ट्र डिस्टीलरी कंपनी आहे तेथे अल्कोहोल येत होते. शेडयूल बी असे आहे की त्यामध्ये एके ठिकाणी असे नमूद होते की इन्डस्ट्रीयल अल्कोहोल हे १.५ टक्के प्रमाणे आणि दारू तयार होण्याचे अल्कोहोल हे पाच टक्के प्रमाणे अधिकाऱ्यानी शक्कल लढविली. हे तर अल्कोहोल इन्डट्रील मध्ये वापरत आहे. मेडले कंपनीने एक औषधी तयार केली. त्यांचे जे भांडे होते ते साफ करण्यासाठी जे अल्कोहोल वापरले जाते ते इंडस्ट्रीज अल्कोहोल म्हणून १.५ टक्के प्रमाणे जकात आकारणी केली जात होती. यामूळे मोठा फरक वाढत गेला. १९८६ ला जकात अधिक्षक श्री.हाशमी साहेब होते त्यांनी पिटीशन दाखल केले. मा.खत्री साहेब न्यायधीश होते त्यांनी महापालिकेला वेळोवेळी म्हटले की इन्ट्रेस असेल तर महापालिकेच्या वकीलांनी म्हणणे मांडावे. १९८६ पासून हे प्रकरण १९९३ पर्यत तसेच प्रलंबीत राहिले. १९९३ नंतर मा. भोगे साहेब आयुक्त म्हणून आले त्यांनी हे पैसे वसूल करावे म्हणून निर्णय घेतला १.५ टक्के प्रमाणे वसूली केली म्हणून १.१३ कोटी रू. कंपनीकडे बाकी होते डिमांड केली. ही डिमांड कमी आहे घाईगरबडीने काढलेली आहे. कंपनीने ३.५० प्रमाणे पैसे भरणा केले. शेडयूल आजही बदलेले नाही. असे असतांना पैसे परत देण्याची वेळ का आलेली आहे. शासनाने अल्कोहोल चे जकात दर कधीही १.५ टक्के केलेले नाही. उलट महाराष्ट्र डिस्टीलरीज कडून १९८६ पासून व्याजासह रक्क्म वसूल करावयास पाहिजे. ते तर नाही परंतू १९९३ पर्यत १.१३ कोटी रू. महापालिकेला मिळाले व आज २.२० कोटी रू. महापालिकेला परत देण्याची वेळ येत आहे. शेडयूल नुसार रेट कमी झालेले नाही तर महापालिकेने कंपनीकडे डिमांड का केली होती व कंपनीने १.१३ कोटी रू. का भरणा केलेले आहे. जी रक्कम जाणार आहे ती या शहरातील नागरीकानी भरलेल्या करातून जाणार आहे. शहराच्या नागरीकांवर याचा बोजा पडणार आहे.

श्री.संजय सिरसाट : स.सदस्य श्री.साजेद यांनी जी सूचना मांडली तो विषय अधिकाऱ्यानी केलेल्या चूका संदर्भात असून अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करायची ती करावी. परंतू मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.त्याप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: अधिकाऱ्याची चूक तसेच मा.न्यायालयात महापालिकेच्या वतीने बाजू माडण्यास आपले वकील कमी पडले. १.१३ कोटी महापालिकेने वसूल केल. २.२० कोटी भरावे लागत आहे. यात वाटाघाटी करून किती कमी रक्क्म कंपनी घेते ते बघावे. नसता मा.सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात अपील करावे. मा.माजी न्यायमुर्ती

श्री.देशमूख साहेब तेथे प्रॅक्टीस करीत आहे.त्यांना कामाचा चांगला अनुभव आहे. त्यांचेकडे हे प्रकरण दयावे.

श्री.रेणुकादास वैद्य :श्री. अनंतभुषण कानडे हे सुध्दा अभ्यासू वकील आहे, विचार करावा.

मा. आयुक्त : जो पर्यत हे प्रलंबीत आहे तोपर्यत मा. उच्च न्यायालयाने म्हटले की कोर्टात रक्क्म जमा करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: या संदर्भात मा.उच्च न्यायालयास विनंती करावी की ही रक्कम भरण्यास महापालिकेकडे सध्या तरतूद नाही. किती महिण्याचा हप्ता आहे याचा उल्लेख यात नाही समान ११ हप्ते असे दिले आहे. एक कमेटी तयार करून दिल्लीला जावून चांगले वकील बघावे त्यांचेकडे हे प्रकरण दयावे. एक प्रकरण आले असे अनेक प्रकरण येतील. महापालिका जास्त कर वसूल करीत आहू. कर भरणाऱ्या लोकांना त्रास देत आहे असा मॅसेज लोकांपर्यत जाईल.या सर्व बाबींचा विचार तज्ञाचा सल्ला घेवून चांगले वकीलाकडे हे प्रकरण दयावे. तरतूद नसेल तर हप्ता कोठून भरणार आहे. एक हप्ता कोठून भरणा केला हे प्रशासनालाच माहित आहे.

मा.आयुक्त : मा.उच्च न्यायालयाचे आदेश असेल तर तरतूदीची गरज नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मा.उच्च न्यायालयात रक्कम जमा करण्याचे आदेश आहे. निर्णय अजूनही नाही. पैसे भरले म्हणजे महानगरपालिकेला मान्य आहे असा समज होईल. तरतूद उपलब्ध होण्याआधी सर्वोच्च न्यायालयात प्रकरण देण्यासाठी वकील निश्चित करावे. प्रयत्न करावे. जनतेच्या पैशाची महापालिकेलाकाळजी आहे असे नागरीकांमध्ये मेसेज जाईल.

श्री. भगवान घडमोडे : प्रशासनाच्या चूकीमूळे महानगरपालिकेच्या विरोधात निकाल गेलेला आहे. हे नेहमीच होते. विरोध पार्टीकडून १ लक्ष व महापालिकेकडून ५ हजार वकीलास फिस मिळते तो त्यामूळे आपले वकील केस हारतात.. यात सुधारणा झाली पाहिजे. टक्केवारीनूसार वकीलाकडे अशा प्रकारच्या केसेस दिल्या पाहिजे. तरच ते महापालिकेच्या बाजूने निर्णय होतील.चांगले वकील पॅनलवर घ्यावे व हे प्रकरण त्यांचेकडे दयावे. ओळखीच्या वकीलाकडे हे प्रकरण देवू नये नसता केस हारेल व यात महापालिकेचे नुकसान होईल. असे प्रकरण गाभीर्याने घ्यावे. ज्या मागे चुका झाल्या त्या पूढे होवू नये. मागिल संचिका ताब्यात घ्याव्यात. चांगले पॅनल करावे. संबधीत व्यक्ती महापालिका प्रकरण जिकंत असेल तरच वाटाघाटी करेल नसता करणार नाही. त्यासाठी वाटाघाटी न करता सर्वोच्च न्यायालयात अपील करावे.निश्चितपणे महापालिकेच्या बाजूने निकाल लागेल.यात शंका नाही.

मा.आयुक्त : दोन मुद्दे महत्वाचे आहे. अपील केले व पुन्हा महापालिकेच्या विरोधात निकाल गेला तर जे व्याज होईल त्यासह रक्कम दयावी लागेल. दुसरे असे की या प्रकरणात जे काही कागदपत्र आहे ते निवृत्त न्यायमुर्ती श्री.देशमुख साहेब यांना देवू व त्यांनी म्हटले तर तडजोड करू.

श्री.भगवान घडमोडे : वाटाघाटी करण्याची कि वकील लावून अपील करायचे यापैकी प्रशासनाचे काय मत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनाच्या इच्छेवर नाही. सभागृहाची काय इच्छा आहे त्या प्रमाणे निर्णय घेवू शकतो.

मा. महापौर : वाटाघाटी करायची असेल तर मा. माजी न्यायमूर्ती श्री. देशमूख हे सध्या सर्वोच्च न्यायालयात वकीली करीत आहे. त्याचा सल्ला घेवून जर प्रकरणाचा निकाल महापालिकेच्या बाजूने लागण्याची शक्यता असेल तर अपील करू जर शक्य नसेल तर त्यानंतरच कपंनीशी वाटाघाटी करण्यात येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: डिस्टीलरीज कंपनी खाजगी व्यक्तीला किती पैसे देत आहे याची माहिती घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : अनेक स.सदस्यांनी या प्रकरणावर वेगवेगळया सूचना मांडल्या. महापालिकेच्या फायदयाच्या बाबी प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्याना का समजू नये. दि.३०.४.२००७ ला पहिला हप्ता भरणा करायचा आहे.ती वेळ गेलेली असून हप्ता भरणा केला असेल चर्चा करून कोणती पॉलीसी ठरविणार आहोत. एक हप्ता जमा केला आहे. जेंव्हा मा.उच्च न्यायालयाने रक्कम जमा करण्याचे आदेशीत केले त्याच वेळी मा.सर्वोच्च न्यायालयात प्रशासनाने अपील का केलेले नाही. डायरेक्ट हप्ता भरण्याचा निर्णय प्रशासनाने का घेतला. याचा खूलासा करावा.

मा. आयुक्त : रक्कम मा.उच्च न्यायालयात जमा केलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : रक्कम जमा करण्याचे जेंव्हा मा.न्यायालयाने आदेशीत केले त्याच वेळी वरच्या कोर्टात अपील करण्याचा निर्णय का घेतलेला नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :यात असे दिले की कंपनी मार्फत प्रथम अपील कमांक ०७/२००७ आणि सिव्हील अपील क्रमांक १६१/२००७ अन्वये प्रकरण पुन्हा नव्याने न्यायप्रविष्ठ केलेले होते. फेब्रुवारी २००७ मध्ये हे प्रकरण आले.व एप्रिलचा एक हप्ता सर्वसाधारण सभेच्या मंजुरी विना दिला गेला. तीन महिने उशीरा का आले. दिं.१२.२.२००७ रोजी प्रकरण अॅडमीट करून मा.दिवाणी न्यायधिश वरीष्ठ स्तर यांच्या निर्णयास स्थगिती दिलेली आहे तथापी सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने ११ समान हप्त्यामध्ये पैसे भरावे असे दिले. याचा अर्थ १९८६ च्या याचिकेमध्ये काही ही झाले नाही. परंतू प्रकरण २००७ मध्ये आले. सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता एप्रिलचा हप्ता भरणा केला. सन २००७ मध्ये पीटीशन आणण्याचे कारण काय ?

मा.आयुक्त : या कंपनीच्या प्रकरणात मा.जिल्हा न्यायालयात महानगरपालिकेच्या विरोधात निर्णय झालेला आहे. त्यानंतर मा.हायकोर्टात महापालिकेने अपील केले. मा.हायकोर्टाने स्थगिती दिली परंतू एक अट टाकली की समान हप्त्यामध्ये ही रक्कम जमा करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : १९८६ ला मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना जिल्हा न्यायालयात पैसे दया म्हणून म्हणण्याचा काय अधिकार आहे. व त्या विरूध्द महानगरपालिकेला मा.उच्च न्यायालयात त्या विरूध्द जाण्याची काय गरज पडली.

श्री.रेणुकादास वैद्य : मा. उच्च न्यायालयाने रक्कम जमा करावी म्हणून निर्देश दिल्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालयात अपील का करण्यात आले नाही.समान हप्ते भरावे की नाही यासाठी सभागृहाची मंजूरी का घेतली नाही.

मा. आयुक्त : सर्व प्रथम फेब्रुवारी मध्ये हे आपल्याकडे पाठवले होते. चर्चेसाठी आज आलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली परंतू रक्कम मा.न्यायालयात जमा करावी असे म्हटले.

श्री.मुजीब खान : काही प्रकरणात विधी सल्लागार यांना माहिती नाही. अनेक प्रकरणात नुसती तारीख वाढवून मिळते. कागदपत्र वेळेवर जात नाही. महानगरपालिकेचे रेकॉर्ड पोहचत नाही. विधी विभाग सक्षम होण्याची गरज आहे. सिनीयर अधिकारी कर्मचारी तेथे असावे. एका प्रकरणात तीन महिणे कागदपत्र महापालिकेच्या वतीने देण्यात आली नव्हती.ती काढून मी स्वत: सादर केली. महानगरपालिकेचे प्रकरण होते. या विभागात सिनीयर कर्मचारी असावे. नसता असे अनेक रक्कमा भरण्याची वेळ येईल. गरवारे कंपनीकडून केमीकलवर ३.५ टक्के प्रमाणे जकात घ्यायला पाहिजे ती १ टक्का घेण्यात आली. त्या संबधीची एका न्यायधीश मार्फत चौकशी चालू होती त्या चौकशीचा अदयाप माहिती समोर आलेली नाही. तसेच जकात पावती बुक प्रकरणाच्या बाबतीतही अदयाप माहिती समोर आलेली नाही. हे सर्व होत असतांना पून्हा तेच अधिकारी त्याच जागेवर कार्यरत होतात. जे जे मुद्य या सभागृहात आजपर्यत मांडले गेले ते सोंडविण्याचे प्रयत्न प्रशासनाने केलेले दिसून येत नाही.

मा. महापौर : गरवारे कंपनीच्या संदर्भात स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी मागे पत्र ही दिलेले आहे विधी विभागाने त्यांना त्या प्रकरणा बाबत माहिती दयावी विधी सल्लागार यांनी १९८६ मध्ये या प्रकरणात काय निकाल लागलेला आहे.

विधी सल्लागार : १९८६ चे जे प्रकरण होते ते महाराष्ट्र डिस्टीलरीज चे होते. ती आपण सर्वोच्च न्यायालयापर्यत जावून रिट पीटीशन मध्ये २००६ मध्ये महानगरपालिकेच्या विरूध्द निकाल लागलेला आहे. त्याच वेळेस मे. बीडीए लिमीटेडची पण प्रकरण चालू होते. जिल्हा न्यायालयाने महाराष्ट्र डिस्टीलरीजचा निकाल कायम ठेवून त्याचे अवलोकन करून महानगरपालिकेच्या विरूध्द बीडीए कंपनीचा निकाल दिला. त्या विरूध्द मा.उच्च न्यायालयात महापालिकेने याचिका दाखल केली. महापालिकेच्या वकीलानी पॉईन्ट न्यायालयासमोर मांडले दोन दिवस सुनावणी झाली. आणि कोर्ट सॅटीसफाईड झाले. आणि मा. न्यायालयाने खालच्या कोर्टाच्या निर्णयाला २.२० कोटी रू. भरावे अशी अट टाकून स्थगिती दिली. त्यानंतरच पूढील म्हणणे ऐकून घेवू. निर्णय देवू जर मा. न्यायालयाने निर्णय महापालिकेच्या बाजूने दिला तर जे जमा केलेली रक्कम आहे ती महापालिकेत पून्हा मिळेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खेदाची बाब आहे महापालिकेने प्रकरण १९८६ ला दाखल केले. त्यांचा निकाल २१ वर्षानंतर लागतो. यावरून विधी विभागा किती सक्षम आहे हे दिसून येते. कॅव्हेट नसतांना स्थगिती मिळालेली आहे.

मा.आयुक्त : १९८६ च्या केसेस मध्ये मा.उच्च न्यायालयात महापालिका जिंकली मा.सर्वोच्च न्यायालयात महापालिकेच्या विरोधात गेले. रिव्ह्यु पीटीटीशन झाली. त्यात हारलो. शेवटचा निर्णय २००६ मध्ये आला .

श्री.अ.साजेद.अ.सत्तार : हे सर्व सत्य असेल तर सन१९८६,१९९३,१९९६,२००४ व २००६ चे पिटीशन मध्ये काय झाले. या प्रकरणात सर्व गौंडबगांल आहे. जे सदस्य बरोबर घ्यायचे त्यांना घेवून मा. आयुक्तांना सोबत घेवून मा.मुख्य न्यायधीश यांचेकडे गेलो तर तात्काळ न्याय मिळेल. मा.सर्वोच्च न्यायालयात जाण्याची गरज नाही. महानगरपालिकेला पैसे का मिळाले होते त्यावेळीही मा.भोगे साहेबांनी मा.मुख्य न्यायधीश महाराष्ट्र यांचेकडे जावून विनंती केली होती .आपण भोगे साहेबांना जावून विचारू शकता. हा नागरीकांचा पैसा आहे.

मा.महापौर : या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. प्रशासनातर्फे दिरगांई झालेली आहे वकील वेळेवर हेरींगसाठी नव्हते होते. कुणी फॉलोप केले नाही कॅव्हेट दाखल केले नाही ही सर्व चौकशी करण्यासाठी या शहरातील न्यायमुर्ती श्री.चपळगावकर साहेब यांना विनंती करण्याचे ठरविलेले आहे. दिरंगाई कशी झाली याची चौकशी करतील.

मा.आयुक्त :दिरंगाई झालेली नाही. १९८६ चे प्रकरण होते. मा.उच्च न्यायालयात जिकंलो मा.सर्वोच्च न्यायालयात हरलो, रिटपीटीशन केले,त्यात पून्हा महापालिकेच्या विरोधात निकाल गेला त्या अधारे बीडीए कंपनीने मा.जिल्हा न्यायालकडून एक निर्णय आणला त्या विरूध्द महापालिका उच्च न्यायालयात गेले. मा.उच्च न्यायालयाने महानगरपालिकेने दोन दिवस म्हणणे ऐकले स्टे दिला परंतू स्टे देतांना न्यायालयात पैसे जमा करावे असे निर्णय दिला. त्यानूसार सभागृहासमोर ठेवले. यानंतर मा.उच्च न्यायालयात अंतिम निर्णय होईल.निवृत्त न्यायमुर्ती यांचा सल्ला घेवून वाटाघाटी करणे हिताचे आहे की नाही नसेल तर चांगले वकील लावून या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल.

श्री.देसरडा प्रशांत : तत्कालीन आयुक्त यांनी संचिकेत लिहले आहे की सेलटॅक्स व इन्कमटॅक्स कार्यालयाशी संपर्क करावा की या कंपनीच्या बॅलेन्ससीट मध्ये महानगरपालिकेला पैसे दिल्याचे नमूद आहे.

मा. आयुक्त : जेंव्हा मा.उच्च न्यायालयात महापालिकेने प्रकरण दाखल केले. तेंव्हा मा.न्यायालयात हा मुद्या मांडला की सदर कंपनीने महापालिकेकडून रक्कम वसूल केली तर कंपनीने ग्राहकाकडून वसूल केले.

श्री.देसरडा प्रशांत : हाच मूद्य मा.सर्वोच्च न्यायालयात का मांडला नाही.

मा. महापौर : मा.सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे ठरविलेले आहे. निवृत्त न्यायमुर्ती श्री.देशमुख साहेब यांचे लिगल ओपनीयन घेवू निगोशिएशन करायचे किंवा कसे,तोपर्यत मा.उच्च न्यायालयात पैसे जमा करावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रकरणात निवृत्त न्यायमूर्ती श्री.बी.एन.देशमुख यांचे तडजोड करण्याबाबत कायदेशीर मत घेण्यास व त्याप्रमाणे तडजोड करायची किंवा मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण दाखल करावयाचे, तोपर्यंत हप्त्यांची रक्कम मा.उच्च न्यायालयात जमा करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१५/५ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराच्या ज्या भागात जलवाहीनी टाकण्यात आलेली नाही तसेच ज्या भागात जलवाहीनी द्वारे पुरेसा पाणी पुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे मोठे सहा व लहान तीन असे एकूण नऊ टँकर आहेत. नागरीकांच्या मागणीप्रमाणे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर कमी पडत असल्यामूळे भाडे तत्वावर खाजगी टँकरची आवश्यकता आहे. नागरीकांच्या आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी टँकर लावण्यात येतील.

या पाण्याच्या टँकरच्या भाड्यापोटी एक वर्षासाठी सर्वसाधारणपणे रू.२५.०० लाख खर्च अपेक्षित असून या कामासाठी सन २००७-०८ अर्थसंकल्पमध्ये तरतूद ठेवण्यात आली आहे. तरी भाडेतत्वावर आवश्यकतेनुसार एक वर्षासाठी खाजगी टँकर लावण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेचे विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.संतोष खेंडके | : २५ लक्ष मध्ये तीन टॅकर खरेदी होतील. |
| श्री.वसंत नरवडे | : टॅकर खरेदी करावे. |
| मा. आयुक्त | : महापालिका खरेदी करू शकते परंतू त्याची देखभाल दुरूस्ती तसेच वाहन चालक ई. खर्च वाढेल. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : ही महानगरपालिका टॅकर मुक्त नाही याचा खूलासा मा.महापौरांनी करावा. |
| मा. महापौर | : महापालिकेने २५ लक्ष मध्ये जेवढे टॅकर येतील ते खरेदी करावे व पाणीपूरवठा करावा. |
| श्री.देसरडा प्रशांत | : प्रस्ताव मंजूर करावा. महानगरपालिकेला टॅकर खरेदी करून पाणीपूरवठा करणे परवडणारे नाही. मेंटनन्स,डिझेल,पगार,ओव्हर टाईम इत्यादी खर्च वाढेल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : महानगरपालिकेने टॅकर खरेदी करावे. |
| श्री.संतोष खेंडके पाटील | : महानगरपालिकेचे स्वत:च्या मालकीचे टँकर असावे. |
| मा.आयुक्त | : नवीन वाहने विकत घेवू नये कारण त्यानंतर त्याचे लेखभाल दुरूस्ती तसेच वेगळा कर्मचारी वर्ग लागतो. त्यात वाहनचालक, ५०% नुकसान सहन करून नागरीकाकडून पाण्यापोटी ६०० रू. घेतो. परंतू महानगरपालिकेने स्वत: खरेदी केले तर तीन वाहनचालक दयावे लागतील. तसेच आठ तासानंतर पून्हा वाहनचालक दयावे लागेल. चार दिवसानंतर त्यांना सुट्‌टी दयावी लागेल. सकाळी ०६.०० ते रात्री १०.०० पर्यंत ०२ वाहन चालक लागतील. जितके ड्रायव्हर उपलब्ध आहे, तेवढे घ्यावे. |
| मा.महापौर | : रू.२५ लाख रक्कमेत जेवढे टँकर महानगरपालिकेला खरेदी करता येतील ते घेण्यांत यावे. या दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरात ज्या भागात जलवाहीनी टाकण्यात आलेली नाही, व ज्या भागात जलवाहीनीद्वारे पुरेसा पाणी पुरवठा होत नाही, त्या भागासाठी टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी टँकरची संख्या कमी पडत असल्याने टँकर भाडे तत्वाने घेण्या ऐवजी

रू.२५/- लक्ष या रकमेत जेवढे पाण्याचे टँकर खरेदी करता येतील ते महानगरपालिकेतर्फे खरेदी करणेस या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१६/६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जय महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, औरंगाबाद यांनी मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक १९/पैकी जमीनीवर शाळेच्या इमारत बांधकाम परवानगीचा प्रस्ताव संचिका क्रमांक ४१७/१७/२००२ नुसार दाखल केला आहे. सदरील शाळा ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक एफ-२१८७ (औरंगाबाद) दिनांक ६ जुन,१९९२ अन्वये नोंदणीकृत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम-१२४ अे-एल नूसार प्रत्येक बांधकाम परवानगी प्रस्तावात विकास शुल्काची(भूखंडाचे क्षेत्रासाठी आणि बांधीव क्षेत्रासाठी) आकारणी करण्यात येते.शासन,नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्रमांक टीपीएस/१२९३/३२/सीआर-८/९३/युडी-१२दिनांक२४.०५.१९९३ नुसार शैक्षणिक वापराच्या बांधकामासाठी विकास शुल्काच्या रक्कमेत ५०% सुट देण्याची तरतूद आहे. त्यानुसार सदरील संस्थेने दिनांक ११.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे विकास शुल्कात ५०% सुट देण्यासाठी विनंती केली आहे. तसेच सदरील बांधकाम परवानगी प्रस्तावास जानेवारी २००३ मध्ये मान्यता झाली असून संस्थेने जमीन विकास शुल्क रक्कम रूपये ५३,२८०/- चलन क्रमांक ०३४४५९ दिनांक २५.११.२००६ आणि शहर विकास निधी रक्कम रूपये ५३,२८०/- चलन क्रमांक ०३०९३९ दिनांक २५.११.२००६ अशी एकूण रक्कम रूपये १,०६,५६०/- जमा केली आहे. दरम्यानच्या कालावधीत संबंधीत संस्थेने बांधकाम परवानगी प्राप्त केली नाही. सदरील प्रस्तावात अर्जदारास बांधकामासाठी विकास शुल्काची (Development Charges for Construction) रक्कम रूपये १,०६,५६०/-भरणे आवश्यक आहे.प्रकरणात संस्थेस शहरविकास निधीची रक्कम रूपये १,०६,५६०/- मध्ये ५० % सुट होवून संस्थेने वरील प्रमाणे यापूर्वीच जमा केलेली रक्कम रूपये ५३,२८०/- ला मान्यता होणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम१९६६ चे कलम १२४ अे-एल नूसार बांधकाम परवानगी देतांना विकास शुल्क आकारणीसाठी शासन,नगर विकास विभाग यांचेकडील निर्णय क्रमांक टीपीएस/१२९३/३२/सीआर-८/९३/युडी-१२ दिनांक २४.०५.१९९३ नुसार शैक्षणिक वापरासाठी विकास शुल्काच्या रक्कमेत५०%सुट देय असल्याने जय महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, औरंगाबाद यांचे मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक १९/पैकी जमीनीवरील शाळेच्या इमारत बांधकाम परवानगीसाठी शहर विकास निधीचे ५०% र.रू.५३,२८०/- सुट देण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१७/७ :**

शासनाकडून आर.सी.एच.-२ प्रकल्प राबविण्यासाठी पत्र क्रमांक जा.क्र.राकुकका/अर्बन/आर.सी.एच./कक्ष-१७/२०१७२-७४/२००७दिनांक२६.०३.२००७ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

युरोपियन कमिशनच्या अर्थसहाय्याने आर.सी.एच.-१ यामध्ये ९० महिला मंडळ प्रतिनिधी व ६ कम्युनिटी ऑर्गनायझर यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सदरील महिला मंडळ प्रतिनिधी यांनी फेज-२ मध्ये लिंक वर्क म्हणून घेण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. आर.सी.एच.-२ मध्ये १६० लिंक

वर्कर घेण्यास मंजूरी आहे. एकूण १६० लिंक वर्कर्स नियंत्रण ठेवण्यासाठी ८ महिला पर्यवेक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे.

आर.सी.एच.१ मध्ये महिला मंडळ प्रतिनिधी व कम्युनिटी ऑर्गनायझर यांना दरमहा अनुक्रमे रूपये १७५०/- व रू.२५००/- मानधन प्रकल्पातर्फे देण्यात येत होत. सदरील प्रकल्प दिनांक ३१ मार्च २००७ अखेर संपुष्टात आलेला आहे. नविन आर.सी.एच. फेज-२ प्रकल्पात रूपये ५००/- प्रतिमाह मानधन देण्याची तरतूद आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सध्या डाटा सेंटर सुरू करण्यात आलेले आहे. याकरिता वरील कर्मचारी यांची आवश्यकता आहे. डाटा सेंटरचे कामाचे स्वरूप पाहता फेज-२ अंतर्गत देण्यात येणारे मानधन अत्यंत कमी आहे. डाटा सेंटरच्या कामात खंड न पडू देता सदरील काम चांगल्या पध्दतीने सुरू ठेवण्यासाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेले मानधनानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रू.१२५०/- व रूपये २५००/- मानधन अदाई करण्यासाठी वार्षिक रूपये २६,४०,०००/- (रूपये सव्वीस लक्ष चाळीस हजार फक्त) आर्थिक बोजा सहन करावा लागेल.

सदरील डाटा सेंटरचे काम सुरळीत चालण्यासाठी,गर्भवती मातांना व बालकांना द्यावयाच्या लसीकरणासाठी व इतर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधासाठी सदरील आर्थिकभार उचलणे आवश्यक आहे.

प्रकल्पा अंतर्गत कार्यरत ६ महिला पर्यवेक्षक व नविन २ महिला पर्यवेक्षकांच्या नेमणूक व मानधनासाठी रूपये २६,४०,०००/- आर्थिकभार महानगरपालिकेने उचलणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेस सादर.

**संवाद :**

श्री.संतोष खेंडके पाटील : स्थगीत करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यासाठी शासनाचे किती अनुदान आलेले आहे व कम्युनिटी ऑर्गनायझर यांना दरमहा अनुक्रमे रूपये १७५० व २५०० मानधन देण्यात येत होते. आता वाढवून देण्याची गरज काय.सदरील पदे विदयापीठाकडून भरण्यात आलेली आहे काय?आरसीएच फेज -२ प्रकल्पात रू़५०० देण्याची तरतूद आहे ५०० रू. देण्यात यावे.शासनाने जे मानधन मंजूर केलेले आहे तेवढेच का देण्यात येत नाही.मंजूर करायचे असेल तर माझा विरोध नोंदवून मंजूर करावा.

श्री.मुजीब खान : मानधन का वाढवून दिले जात आहे. याचा खूलासा करावा. कोणत्या निकषाने वाढवून द्यायचे.

श्री.संतोष खेंडके : स्थगित करावा पूढील बैठकीत घेण्यात यावे.

मा. आयुक्त : पदे मंजूर होवून आलेली आहे. आर सी एच मध्ये नवीन ७ सेन्टर सुरू करायचे आहे. जितके लवकर घेणार तितक्या लवकर ही सुविधा देणे सुरू करता येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जो अस्थापनेचा खर्च होत आहे तो अगोदरच जास्त आहे आणखी खर्च करण्याला अर्थ नाही.

मा. महापौर : हा विषय तुर्त स्थगित ठेवून हा प्रकल्प नांदेड व इतर महानगरपालिकेत कशा पध्दतीने चालतो याची आरोग्य वैद्य.अधिकारी यांनी माहिती घेवून सर्वसाधारण सभेपूढे ठेवावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेस आणि हा प्रकल्प नांदेड व इतर महानगरपालिकेत कशा पध्दतीने राबविला जातो, याची आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माहिती घेवून सर्वसाधारण सभेपूढे ठेवावी असे ठरले.

**विषय क्र. ८१८/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी) परिसरातील रस्त्यांचे पुर्न:डांबरीकरण करणे. यासाठी दि.०६.१२.२००६ रोजी अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या दालनात संबंधीत विभागाचे अधिकारी व मनपा पदाधिकारी व अधिकारी यांच्या संयुक्त बैठकीत अधिष्ठाता यांनी सदर परिसरातील रस्त्यांची स्थिती खुपच खराब झालेली असल्यामूळे रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांची गैरसोय टाळणेसाठी सदर भागातील डांबरीकरण महानगरपालिकेतर्फे करणे बाबत विनंती केली होती. त्यानुसार सदरील बैठकीतील निर्णयानुसार या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.१९,६३,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००७-०८ या आर्थिक वर्षात पुर्न:डांबरीकरण या लेखाशिर्षात समाविष्ट करून करण्यात येणार आहे. रस्त्याची एकूण लांबी १२३५ आणि रूंदी साधारणपणे ३ मी. आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.१९,६३,३००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव व मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (घाटी) परिसरातील रस्त्यांचे पुर्न:डांबरीकरण करणेच्या कामाचे रक्कम रू.१९,६३,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१९/९ :**

(सर्वसाधारण सभा दिनांक २०.१.२००७ चे विषय क्र.६९५/९ अन्वये स्थगित ठेवलेला प्रस्ताव पुन्हा ठेवणेसाठी प्रशासनाकडून प्राप्त)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सर्व अधिकृत/अनाधिकृत व व्यवसायीक नळ जोडणीची तपासणी करून अनाधिकृत, व्यवसायिक नळ अधिकृत करून सर्व व्यवसायीक नळ जोडण्यांना जलमापक यंत्र बसवून पाणीपट्टीची वसूली महानगरपालिका दरानुसार करणे या कामासाठी खाजगी अभिकर्त्याकडून Turn Key पध्दतीवर निविदा मागविण्याचे नियोजन आहे.

**अ. अधिकृत नळ जोडण्या**

- आज रोजी शहरात अधिकृत व्यवसायीक नळ जोडणी संख्या - ९१६
- अधिकृत नळ जोडणीद्वारे अपेक्षीत वार्षीक उत्पन्न - रू.१५२.५९ लक्ष

नळ जोडणीची व्यासनिहाय संख्या व उत्पन्न खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | व्यास (इंच) | संख्या | पाणी पट्टी दर | अपेक्षीत उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| ०१ | १/२ | ५७४ | ६५०० | ३७.३१ लक्ष |
| ०२ | ३/४ | १५४ | १२००० | १९.६८ लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | १ | १४४ | २५००० | ३६.०० लक्ष |
| ०४ | १ १/२ | १८ | ७०००० | १२.६० लक्ष |
| ०५ | २ | १५ | १४०००० | २१.०० लक्ष |
| ०६ | ३ | ०३ | २००००० | ६.०० लक्ष |
| ०७ | ४ | ०६ | ३००००० | १८.०० लक्ष |
| ०८ | ६ | ०२ | ४००००० | ८.०० लक्ष |
| | **एकूण** | **९१६** | | **१५२.५९ लक्ष** |

**ब. अनाधिकृत नळ जोडण्या**

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे नोंदविलेल्या अधिकृत व्यवसायीक नळांव्यतिरिक्त शहरात १२३३ व्यवसायीक अनाधिकृत नळ जोडण्या असाव्यात असा आरोग्य विभाग व अग्नीशमन विभागाकडे नोंदविलेल्या उद्योगधंद्याची यादी पाहता अंदाज करता येतो.

या १२३३ व्यवसायीक नळ धारकांकडून आज रोजी महानगरपालिकेस कूठलेही उत्पन्न मिळत नाही. उपरोक्त १२३३ नळ कनेक्शन अभय योजने अंतर्गत अधिकृत केल्यास मनपास खालील प्रमाणे उत्पन्न अपेक्षीत आहे.

मनपा अभय योजने अंतर्गत व्यास निहाय रक्कम

| अ.क्र. | व्यास | दंड | रस्ता दुरूस्ती | चालू वर्षाची पाणी पट्टी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५ मीमी / १/२ इंच | ४०००/- | २००/- | ६५००/- | १०७००/- |
| २ | २० मीमी/ ३/४ इंच | ५०००/- | २००/- | १२०००/- | १७२००/- |
| ३ | २५ मीमी / १ इंच | ६०००/- | २००/- | २५०००/- | ३१२००/- |

उपरोक्त दरांना मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.३५२/३ दिनांक १९.०६.२००४ रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

वरील दरांनुसार विचार करता मनपास १२३३ अनाधिकृत नळांद्वारे खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | व्यास | नळ संख्या (अंदाजे) | दर | उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | १५ मीमी | ७४० | १०७००/- | ८९.१८ लक्ष |
| २ | २० मीमी | ३७० | १७२००/- | ६३.६४ लक्ष |
| ३ | २५ मीमी | १२३ | ३१२००/- | ३८.३८ लक्ष |
| | | | | **एकूण –१८१.२० लक्ष** |

म्हणजेच अधिकृत नळांची पाणीपट्टी व अनाधिकृत नळ अधिकृत करणे यामूळे मनपास एकूण १५२.५९+१८१.२० = ३३३.७९ लक्ष म्हणजेच रू.३३४ लक्ष इतके उत्पन्न मिळू शकते.

याकामाकरीता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यासाठी निविदा मागवून स्पर्धात्मक दर मागविणे योग्य राहील.मनपाने ठरवून दिलेल्या उत्पन्नापेक्षा म्हणजेच रूपये३३४.००लक्षपेक्षा जास्तदराची (उत्पन्नाची)निविदा दाखल करणाऱ्या अभिकर्त्यास खालील अटी व शर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.

**भाग– अ:–	सर्व्हेक्षण करून नळ नियमीत करणे.**

१.	खाजगी सर्व्हेक्षकाने शहरातील सर्व व्यवसायीक नळ जोडण्यात तपासाव्यात.

२.	नळ धारकास नळाचे कागदपत्र सादर करण्याबाबतची नोटीस द्यावी. नोटीस देण्याबाबतचा अधिकार संबंधीतास देण्यांत येईल.

३.	नोटीसची मुदत संपल्यानंतर अधिकृत व अनधिकृत अशी वर्गवारी करावी.

४.	अनधिकृत नळधारकाकडून महानगरपालिकेने अभय योजने अंतर्गत ठरवून दिलेल्या रक्कमेनुसार पैसे वसूल करावेत व संबंधीतास त्याबाबतची रितसर पावती द्यावी.

५.	खाजगी अभिकर्त्याने दर भरलेली रक्कम ही १२ समान हप्त्यात प्रत्येक महिन्याच्या तीन तारखेपर्यंत महानगरपालिका कार्यालयात जमा करणे व त्याबाबत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांना अवगत करणे बंधनकारक राहील.

६.	सर्वेक्षणासाठी लागणाऱ्या प्रपत्राचा मसूदा/पावती पुस्तके/नोटीस इत्यादी पाणी पुरवठा विभागाकडून मंजूर करून घ्यावे लागेल. मसुदा मान्यतेनंतर त्यात कुठलाही बदल पाणी पुरवठा विभागाच्या संमतीशिवाय करता येणार नाही.

७.	सर्व्हेक्षणासाठी लागणारा सर्व खर्च अभिकर्त्यास करावा लागेल.

८.	सर्व्हेक्षण करणाऱ्या संस्थेस सर्व्हेक्षणासाठी लागणारे कर्मचारी स्वखर्चानेनेमावे लागतील. तसेच करार संपुष्टात आल्यावर हे कर्मचारी महानगरपालिकेत नोकरीबाबत हक्क सांगणार नाही याबाबत रूपये १००/- च्या मुद्रांकावर हमी पत्र द्यावे लागेल.

९.	सर्व्हेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी महानगरपालिकेस ओळखपत्रासह द्यावी लागेल तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यांने सर्व्हेक्षण करतेवेळी ओळखपत्र वापरणे बंधनकारक राहील.

१०.	अनाधिकृत नळ सर्व्हेक्षण करतांना एखाद्या नळधारकाने नळ अधिकृत करण्यास नकार दिला तर त्या नळधारकाचे नळ कनेक्शन खंडीत करणे व संबंधीतावर पोलीस कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

**भाग–ब मिटर बसविणे**

११.	अभिकर्त्याने अधिकृत केलेल्या नळांना व्यासनिहाय ISI प्रमाणित पाण्याचे मिटर बसविणे बंधनकारक राहील. मिटरबसविण्याचा दर वउत्पादीत कंपनी महानगरपालिका ठरवील. बसविलेल्या मिटरची रक्कम ही महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार नळधारकांकडून १२ समान हप्त्यात वसूल करण्याची जबाबदारी अभिकर्त्यांची राहील.

१२.	करार संपुष्टात आल्यावर मिटर सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिका कर्मचाऱ्यांसोबत पाहणी करून द्यावे लागेल.

**भाग–क	अधिकृत नळांना मिटर बसविणे व पाणी पट्‌टी वसूली करणे.**

१३.	महानगरपालिकेकडे नोंदणी असलेल्या अधिकृत नळांना व्यासनिहाय ISI प्रमाणीत पाण्याचे मिटर बसविणे बंधनकारक राहील. मिटर बसविण्याचा दर व उत्पादीत कंपनी महानगरपालिका ठरवील. बसविलेल्या मिटरची रक्कम ही महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार नळधारकांकडून १२ समान हप्त्यात वसूल करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.

१४.	अधिकृत नळांना बसविलेल्या मिटरची रिडींग ही सर्व्हेक्षकास प्रत्येक महिण्यास घेवून महानगरपालिकेच्या दरानुसार पाणी देयक देण्याची व पाणीपट्‌टी वसूल करण्याची जबाबदारी सर्व्हेक्षकावर राहील.

१५. सर्व्हेक्षणाबाबत,मिटर बसविणे,रिडींग घेणे,वसूली करणे याबाबत आयुक्त,महानगरपालिका यांचे निर्णय अंतिम राहतील.

१६. अधिकृत नळांची पाणी पट्‌टी वसूली ही कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून पुढील वित्तीय वर्षाकरीत राहील. मागील थकबाकी ही महानगरपालिका वसूल करेल. थकबाकी वसूल करण्याचा अधिकार अभिकर्त्यास राहणार नाही.

१७. उपरोक्त काम करण्यासाठी कार्यादेशापूर्वी खाजगी सर्व्हेक्षकास अनामत रक्कम म्हणून रूपये २०% महानगरपालिकेकडे बँक गॅरंटीच्या स्वरूपात जमा करावी लागेल.

१८. अधिकृत केलेल्या नळांची तपशीलवार माहिति तसेच पाणीपट्‌टी वसूली बाबत स्वतंत्रपणे नोंदी ठेवण्यात येवून त्याबाबतचा दैनंदिन अहवाल कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांना देणे बंधनकारक राहील.

१९. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करतांना कोणतीही कादेशीर अडचण आल्यास आयुक्त, महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

**संवाद :**

श्री.संजय जगताप : रद्द करावा.

श्री.किशनचंद तणवानी : अधिकृत व्यवसायिक नळ जोडणी संखया ९१६ दिली ती चूकीची आहे. चूकीचा प्रस्ताव का ठेवला

श्री.अ.साजेद अ. सत्तार : महानगरपालिकेच्या कामात सुधारणा व्हावी म्हणून आपण सतत १५ दिवस महापौर बंगल्यावर सर्व पदाधिकारी व अधिकारी यांची बैठक आयोजित केलेली होती. त्या बैठकीत आपण बाबा पेट्रोल पंप ते प्रेसिडेंट पार्क हॉटेल पर्यत व्यावसायिक व अनधिकृत नळ कनेक्शन किती आहे म्हणून तपासणी करण्याचे आदेशीत केले होते. ते काम न करता अधिकारी या प्रस्तावानूसार गरीबाचे नळ तोडणी करण्याचा प्रयत्न करीत आहे.

मा. महापौर : हा विषय रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ८२०/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पुंडलिकनगर गारखेडा परिसरात महानगरपालिकेचे एकही स्मशान भूमी नाही. या भागातील लोकसंख्या अंदाजे १ लक्षच्या वर असून या भागातील जनतेस मृतांचे अंत्यसंस्कार करण्यास स्मशान भूमी उपलब्ध नसल्याने नागरीकांची गैरसोय निर्माण होत आहे. तथापी महानगरपालिका प्रशासनाने तातडीची कार्यवाही करून या भागात स्मशान भूमी तयार करणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

करीता नागरीकांची गैरसोय लक्षात घेता पुंडलिकनगर, गारखेडा परिसरात महानगरपालिकेने स्मशानभूमी बांधण्याचा प्रस्तावास सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील

अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगांवकर, श्री.विजय खुडे, सौ.अंजली कोंडेकर

**संवाद :**

श्री.संतोष खेंडके : यात स.सदस्य श्री.शशांक विसपूते यांचे सूचक म्हणून नाव नमूद करावे.

श्री.प्रशांत देसरडा : कारगिल शहीद स्मारकाचे उद्घाटन केले अदयाप त्या जागेचा ताबा महापालिकेने घेतलेला नाही. ही स्मशान भूमी कोठे करणार आहे.

श्री.संगिता जाधव : सूचक म्हणून माझेही नाव टाकण्यात यावे.

मा. महापौर : या प्रस्तावात सुचक म्हणून स.सदस्य श्री.शंशाक विसपूते तसेच स.सदस्या सौ.संगिता जाधव यांचे नाव टाकण्यात यावे. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिकनगर गारखेडा परिसरात स्मशानभूमी बांधणेस तसेच या प्रस्तावात सुचक म्हणून स.सदस्य श्री.शंशाक विसपुते व स.सदस्या सौ.संगिता जाधव यांचे नांव टाकणेसही सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रशासकीय प्रस्ताव**

**विषय क्र. ८२१/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर सद्यस्थितीत एक पशुधन विकास अधिकारी यांचे पद मंजूर आहे. या पदाचे कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२०००/०१. दि.०१.०१.२००० अन्वये पशुधन विकास अधिकारी या पदाचे मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्राहलय असे करण्यात आले. तसेच सदर पदास पाचव्या वेतन आयोगानुसार रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी लागू करण्यास नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.एएमसी-१४२००१/१२०९/प्र.क्र.१३२/०१/नवि-२४. दि.१७.०५.२००४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सेवाभरती नियमात सदर पदाची अर्हता व नियुक्तीची पध्दत खालीलप्रमाणे दिलेली आहे.

**अर्हता :-**

०१. पशुधनशास्त्र आणि पशुसंवर्धन या विषयातील पदवी.

०२. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आधीपासून सेवेत असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून वय अधिक नसावे.

**नियुक्तीची पध्दत :-**

०१. सदर पदाच्या अर्हतेमध्ये उपबंधीत केल्याप्रमाणे अर्हता असणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती किंवा

०२. पशुवैद्यक शास्त्र आणि पशुसंवर्धन विषयातील पदवी आणि पाच वर्षाचा अनुभव असणाऱ्या सहा.पशुधन विकास अधिकाऱ्याच्या संवर्गातून पदोन्नतीद्वारे नियुक्ती.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्याचे पद मंजूर नाही. तसेच सदर पद हे वर्ग-१ मधील असल्याने उक्त सेवाभरती नियमात पदाची अर्हता व नियुक्तीची पध्दत दर्शविलेली आहे. मात्र प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतूद नसल्याने व सध्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सदर विभागात कार्यरत असलेले मुख्य पशु संवर्धन अधिकारी तथा संचालक,प्राणि संग्राहलय हे नजीकच्या काळात सेवा निवृत्त होत असल्याने, ते वगळता पात्र व अनुभवी उमेदवार नाही. भविष्यात प्राणि संग्राहलयातील प्राण्यांची निगा व देखभालीमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येवू नये, यासाठी सदर पदाच्या नियुक्तीच्या पध्दतीत नामनिर्देशन,पदोन्नती याच बरोबर प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे, असे प्रशासनाचे मत असून तशी दुरूस्ती सेवा भरती नियमात करण्या बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संतोष खेंडके : या पदावर डेप्यूटेशनवर अधिकारी मागवावे.

मा. महापौर : डेप्यूटेशनवर अधिकारी मागविण्यात यावे. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक,प्राणि संग्राहलय या पदाच्या नियुक्तीच्या पध्दतीत नामनिर्देशन,पदोन्नती याच बरोबर प्रतिनियुक्तीने भरण्यास तसेच तशी दुरूस्ती सेवा भरती नियमात करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**चर्चा :**

श्री. वसंत नरवडे : पुरवणी विषय पत्रिका सर्व सदस्यांना मिळालेली नाही. घेण्यात येवू नये.

श्री.संतोष खेंडके : पूरवणी विषय पूढील बैठकीत घेण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : ऐनवेळी विषय घेवू नये. पूढील सभेत घ्यावे दोन तीन दिवसानंतर बैठक आयोजीत करावी.

मा. महापौर : पूरवणी विषय पत्रिकेवरील विषय क्र १ वर बोलावे.

**विषय क्र. ८२२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजनेत वार्ड क्र.२९ मध्ये सलीम अली सरोवराजवळच्या फसील लगत १२.०० मीटर रूंदीचा डि.पी.रस्ता नुरूलहुदा दर्गा पासून मजनु हिल येथील ८० फुट रस्त्यास मिळतो आणि पुर्वीकडील खुनी दरवाजा पर्यंत प्रस्तावीत आहे. सदरील डि.पी.मधील वरील रस्ता लवकरात लवकर संपादीत करावा कारण या भागात पूर्ण विकास झालेला असून दाट वस्ती अस्तीत्वात आहे. वरील रस्त्याचे भूसंपादन करून रस्ता विकसीत केल्यास वाहतूकीस उपलब्ध होईल. तसेच वरील डि.पी.रस्ता नुरूल हुद्वा दर्गापर्यंतच डि.पी मध्ये प्रस्तावित आहे. वास्तवीक पाहता सदरील रस्ता दिल्ली गेट पर्यंत असणे आवश्यक आहे. करीता नुरूल हुदा दर्गा ते दिल्लीगेट रस्ता १२.०० मी.रूंदीसाठी नॉन डि.पी. रस्ता म्हणून संपादित करणे आवश्यक आहे जेणे करून रहदारी सुरळीत होईल.

तसेच आलमगीर कॉलनीच्या उत्तरेकडील मनपाच्या शाळेपासून ते ८० फुट मजनुहिल रस्ता पर्यंत पूर्व -पश्चिम १२.०० मी.डि.पी.रस्त्याचे सुध्दा भूसंपादन करणे आवश्यक आहे. या भागात गणेश कॉलनी, आलमगीर कॉलनी ह्या जुन्या दाट वस्तीच्या वसाहती आहे.या वसाहती अंतर्गत एकही मोठ्या रूंदीचा रस्ता नाही.

करीता १. दिल्लीगेट ते नुरूल हुदा दर्गा १२.०० मी. नॉन डि.पी. रस्ता तसेच नूरूल हुदा दर्गा पासून पुर्वी कडील खुनी दरवाजा पर्यंतचा १२.०० मी. डि.पी.रस्ता आणि २. मनपा शाळे पासून ८० फुट मजनू हिल रस्त्यापर्यंत चा १२.०० मी. रूंद रस्त्याच्या भूसंपादनाच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.मो.जावेद मो.इसाक अनुमोदक : श्री.खान मुजीब मिर आलम खान

मा. महापौर : मंजूर करण्यात येतो, टीडीआर देण्यात यावे किंवा भूसंपादन करण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजनेतील वार्ड क्र.२९ मधील नुरूल हुदा दर्गा ते दिल्लीगेट रस्ता १२.०० मी.रूंदीसाठी नॉन डि.पी. रस्ता म्हणून संपादित करणेस किंवा टीडीआर देणेस तसेच आलमगीर कॉलनीच्या उत्तरेकडील मनपाच्या शाळेपासून ते ८० फुट मजनुहिल रस्ता

पर्यंत पूर्व -पश्चिम १२.०० मी.डि.पी.रस्त्याचे भूसंपादन करणेस किंवा टीडीआर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : विषय क्र २,३,४,५,६, मंजूर करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ८२३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हा बिलियर्डस् अँड स्नुकर असोसिएशन, औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा पातळीवर स्नुकर स्पर्धा आयोजित करण्यात यावी. या स्पर्धेकरीता ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) खर्च अपेक्षीत आहे. तरी मनपा व औरंगाबाद जिल्हा बिलियर्डस् अँड स्नुकर असोसिएशन, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा विभागीय पातळीवर स्नुकर स्पर्धा आयोजित करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा बिलियर्डस् अँड स्नुकर असोसिएशन, औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा पातळीवर स्नुकर स्पर्धा आयोजित करण्यास व या स्पर्धेकरीता येणाऱ्या र.रू.५०,०००/- (पन्नास हजार रूपये) खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हा आर्म रेसलींग असोसिएशन, औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा पातळीवर आर्म रेसलींग स्पर्धा गेल्या सात वर्षापासून आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेस मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात खेळाडू भाग घेत असतात. प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी देखिल संस्थेतर्फे आर्म रेसलींग स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेकरीता ९६,०००/- (शहाण्णव हजार रूपये) खर्च अपेक्षीत आहे. तरी मनपा व औरंगाबाद जिल्हा आर्म रेसलींग असोसिएशन, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा विभागीय पातळीवर आर्म रेसलींग स्पर्धा आयोजित करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी मिळण्याकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा आर्म रेसलींग असोसिएशन, औरंगाबाद व औरंगाबाद महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा पातळीवर आर्म रेसलींग स्पर्धा आयोजीत करणेस व या स्पर्धेसाठी येणाऱ्या र.रू.९६,०००/- (शहाण्णव हजार रूपये) खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२३ मसनतपूर प्रभागात दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध विकास कामे करण्याकरीता र.रू.५० लक्षची तरतुद करण्यात यावी, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहिस्तव पाठविणे करीता मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे अनुमोदक : श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२३ मसनतपूर प्रभागात दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध विकास कामे करण्याकरीता र.रू.५० लक्षची तरतुद करण्यास व सदर तरतुदीसाठी प्रस्तुत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पुढील कार्यवाहिस्तव पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला व बालकल्याण समिती अंतर्गत शहरातील प्रत्येक वार्डातील पाच (०५) गरीब व होतकरू महिलांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातून पापड तयार करण्याचे यंत्र महिला व बालकल्याण समिती अंतर्गत देणे व यासाठी लागणारा संभाव्य खर्चास मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमल तुकाराम बेंद्रे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिला व बालकल्याण समिती अंतर्गत शहरातील प्रत्येक वार्डातील पाच (०५) गरीब व होतकरू महिलांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोणातून पापड तयार करण्याचे यंत्र महिला व बालकल्याण समिती अंतर्गत देणेस व यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.आ.श्रीकांत जोशी यांच्या निधीतून अशोका हॉटेलच्या परिसरात औरंगाबाद महानगरपालिके मार्फत बांधण्यात आलेल्या सभागृहास स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांचे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मधुकर सावंत, श्री.भगवान घडमोडे, श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, श्री.संजु रिडलॉन, श्री.महेश माळवतकर,सौ.विजया किशोर रहाटकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.आ.श्रीकांत जोशी यांच्या निधीतून अशोका हॉटेलच्या परिसरात औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या सभागृहास स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांचे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार औरंगाबाद शहराच्या सुधारित विकास योजनेतील शेतजमिन सर्व्हे क्र.११० व १३९ मुजफ्फरनगर (कुमती) हा भाग ना विकास क्षेत्रामध्ये (No Development Zone) मध्ये समाविष्ट असून सदर भागात आजुबाजूस रहिवासी क्षेत्र विकसित होत आहे. करिता सर्व्हे क्र.११० व १३९ मुजफ्फरनगर (कुमती) या जमिनीला ना विकास क्षेत्रातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेसाठी सादर.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये फेरबदल करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करणे व ही संपूर्ण कार्यवाही करण्याचे सर्वाधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

मा. महापौर          : हा विषय स्थगित करण्यात येत आहे. ऐनवेळचे कोणतेही विषय घेण्यात येत नाही.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

या बरोबरच ''राष्ट्रगिताने'' सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव ,**
महानगरपालिका औरंगाबाद.